अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | रविवार, दि. २५ जून २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : २६६ वा किंमत : ५ रुपये | पाने ८

## गावडी दारफळ येथे दुचाकी घसरल्याने तरुण ठार, एक जखमी

सुराज्य/सोलापूर

सोलापूर ते बार्शी मार्गावरील गावडी दारफळ जवळ दुचाकी घसरल्याने गणपतसिंग अनुपसिंग राजपूत (वय २५ रा. जुळे सोलापूर) हा तरुण गंभीर जखमी होऊन मरण पावला. हा अपघात शनिवारी पहाटेच्या सुमारास घडला.

गणपतसिंग राजपूत हा आपल्या दुचाकीवरून हुकुमसिंग राजपूत (वय २८ रा.जुळे सोलापूर) याच्यासोबत बार्शी ते सोलापूर असा प्रवास करीत होता. पहाटे २ वाजेच्या सुमारास गावडी दारफळ येथील जय मल्हार धाब्याजवळ दुचाकी घसरल्याने दोघेही गंभीर जखमी झाले होते.त्यांना रुग्णालयात दाखल केले असता त्यापैकी गणपतसिंग राजपूत उपचारापूर्वी मयत झाला.

### वृद्धेचा गळा दाबून दरोडेखोरांनी ३५ हजाराचे दागिने लुटले

सालापूर -पत्रा शेडमध्ये झोपलेल्या ८० वर्षीय वृद्ध महिलेचे गळा दाबून तसेच त्यांना दगडाने मारहाण करून दरोडेखोरांनी त्यांच्या अंगावरील ३४ हजार रुपये किमतीचे दागिने लुटून पोबारा केला. ही घटना (केतुर नं.२ता. करमाळा ) येथे शुक्रवार घडली गोपाबाई देवकते या घरा जवळील पत्रा शेडमध्ये झोपी गेल्या होत्या. दोघा दरोडेखोरांनी त्यांच्या घरात प्रवेश केला आणि त्यांच्या त्यांचा गळा दाबून त्यांना अंगावरचे दागिने काढून देण्यास सांगितले. त्यांनी नकार दिला असता दरोडेखोरांनी त्यांना मारहाण करून जखमी केले आणि त्यांच्या गळ्यातील सोन्याचे दागिने लुटून पोबारा केला. त्यांचा नातू नितीन देवकाते यांनी करमाळा पोलिसात फिर्याद दाखल केली. तपास पो.नि. गुंजवटे करीत आहेत.

# संतांच्या पदस्पर्शाने वरुणराजा झाला जागृत

# धुवाँधार पावसाने बळीराजाच्या आशा पल्लवित

सुराज्य/विशेष प्रतिनिधी

**सोलापूरसह जिल्ह्यात शनिवारी दुपारी जोरदार पाऊस पडला. सोलापुरात धुवाँदार पर्जन्यवृष्टी झाली. शनिवारच्या सकाळी निसर्गात जणू चमत्कारच दिसून आला. आकाश ढगांनी व्यापलेले होते. प्रतीक्षा होती, पावसाची. अखेर दुपारी वरूणराजा प्रसन्न झाला. चार दिवसांवर आषाढी एकादशीचा सोहळा येवून ठेपला आहे. अख्खा जून महिना पावसाने दडी मारली. त्यामुळे बळीराजा चिंतेत होता. श्रीविठुरायाला साकडे घालायचेच होते परंतु सावळ्या विठ्ठलाच्या भेटीने संतांच्या पालख्या सोलापूरच्या भूमीत आल्या आल्या पावसाची कृपा झाल्याने शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. संतांच्या भक्तीरूपी पदस्पर्शाने वरूणराजा झाला जागृत, अशीच आनंदाची भावना सर्वत्र व्यक्त झाली.**





गेल्या तीन महिन्यांपासून ४० अंशांपर्यंतच्या तापमानाने अख्खा जिल्हा चांगलाच तापला होता. रोहिणी व मृग ही दोनही नक्षत्रे कोरडी गेल्यानंतर शेतकऱ्यांच्या तोंडचे पाणी पळाले होते.खरीपाच्या पेरण्या खोळंबल्या आहेत. बागायतदार शेतकऱ्यांनी उडीद व तूर या पिकांच्या पेरण्या उरकून घेतल्या पण जिराईदार शेतकरी चातकाप्रमाणे पावसाची वाट पहात होता.

गुरूवारपासूनच राज्यात मान्सून दाखल झाल्याच्या बातम्या जिल्हावासियांच्या कानावर थडकत होत्या. शनिवारी एकाएकी निसर्गाची किमया दिसून आली. रामप्रहरातच आकाश ढगांनी व्यापून गेले. हलक्याशा वाऱ्यांनी वातावरण आल्हादायक बनले.दुपारी सूर्याने डोकावले पण ढगांनी वेळीच त्याला रोखले. दुपारी साडे तीननंतर वातावरणाचे रूपच पालटले. काळसर ढगांची दाटीवाटी झाली आणि पावसाला सुरूवात झाली. सुमारे अर्धातासापेक्षा जास्त सोलापुरात जोरदार पर्जन्यवृष्टी झाली. सायंकाळी सहापर्यंत संततधार सुरूच होती. अधूनमधून मेघगर्जनाही झाली. वाऱ्यामुळे झाडांमधील फांद्यानी मनमुरादपणे झोका घेतला. अजून दोन-चार दिवस पावसाची कृपा राहिली तर बाजरी, तूर, सोयाबिन, उडीद, तीळ, मका या खरीप पेरण्यांना वेग येईल. पावसाअभावी खत आणि बियाणे विक्रेत्यांमध्ये चिंतेचे वातावरण होते. पेरण्यांना सुरूवात झाल्यानंतर कृषी केंद्रांना तेजी यायला लागेल.

### विक्रमी नोंद...

सोलापूरसह जिल्ह्यातील पहिल्याच पावसाने यंदाच्या पावसाळ्यातील पहिलाच विक्रम केला. दुपारी सुरू झालेल्या पावसाची सोलापुरात सायंकाळपर्यंत संततधार सुरूच होती. ५-३० पर्यंत ६६.२मिमी पावसाची नोंद झाली तर रात्री ८-३० पर्यंत **६९ मिमी** इतकी नोंद हवामान खात्याकडे झाली.

आमच्या ठिकठिकाणच्या प्रतिनिधींनी कळवले आहे की - बार्शी वगळता सर्वत्र पावसाने हजेरी लावली आहे. पंढरपूर, माळशिरस, सांगोला, माढा, मोहोळ, दक्षिण सोलापूर, अक्कलकोट या तालुक्यांमध्ये जोरदार पाऊस पडला. उत्तर सोलापूर तालुक्यात नान्नज, तिऱ्हे, वडाळा, डोणगाव, मार्डी या भागात पाऊस झाल्याचे सांगण्यात आले. अकलूज, वेळापूर, माळशिरसमध्ये मोठा पाऊस झाला. करमाळ्यात किंचित पाऊस झाला. बार्शी तालुका मात्र उपेक्षितच राहिला. ढगाळ हवामानही नव्हते. उकाड्याने बार्शीकर हैराण झालेले होते.

### ‘उजनी’साठीही प्रार्थना...

दरवेळच्या पावसाळ्यात सोलापूर जिल्हावासियांना उजनीसाठीही प्रार्थना करावी लागते. उजनी ही सोलापूरसह जिल्ह्याची वरदायिनी आहे. पिण्याच्या पाण्यासह शेतीच्या पाण्याची गरज ती भागवत असते. धरणातील पाण्याची पातळी खालावली असून सोलापूरच्या पाणी पुरवठ्यात २० टक्के कपात करण्यात आली आहे. भीमा-सीना या नद्या कोरड्या पडल्याने नदीकाठी भीषण पाणी टंचाई निर्माण झाली आहे. पुणे जिल्ह्यात मोठा पाऊस पडला तरच उजनी भरणार आहे अन्यथा नाही. पण पुण्यात शुक्रवारी आणि शनिवारी मुसळधार पाऊस पडल्याचे वृत्त आहे. ही अजून एक आनंदाची बाब. उजनीची पातळी वाढण्यासाठी पुण्यात सातत्याने मुसळधार पाऊस पडावा, अशी प्रार्थना जिल्हावासियांकडून होते आहे. जून महिन्यात पुण्यात पाऊस पडला असता तर चित्र वेगळे दिसले असते परंतु मान्सूनचे आगमन उशिरा झाले. त्यामुळे सोलापूर जिल्हावासियांना नेहमीप्रमाणे आशा करत बसावे लागेल.



### वैशाख वणवा सरला हो...

‘धरणी आईची माया,कशी जाईल वाया’, हे एक शेतकरी गीत सर्वांना परिचित आहे. ‘वैशाख वणवा सरला हो, मिरगाचा पाऊस झाला हो’ अशी एक उत्तम काव्यपंक्ती त्यात आहे. मृगाचा पाऊस पडला की, वैशाख वणवा पळून जातो,असे जाणकार सांगतात पण यंदा वेगळाच अनुभव आला. जूनच्या शेवटच्या आठवड्यापर्यंत या वणव्यात सोलापूरकरांची होरपळ झाली. मृग नक्षत्र केव्हाच संपले. आता आर्द्रा नक्षत्र सुरू आहे. त्यामुळे आर्द्राचा पाऊस झाला हो, वैशाख वणवा पळाला हो, असेच म्हणावे लागेल. शनिवारी सूर्य ढगांच्या आड लपून राहिला. तापमान ३५.७ अंशांपर्यंत होते. अंगाची लाहीलाही बिलकूल नाही. श्वास एकदम मोकळा - मोकळा झाला.





## तुकाराम महाराज पालखीचे सोलापूर जिल्ह्यात आगमन

### नेत्रदीपक रिंगण सोहळ्याने वारकरी सुखावला

सुराज्य/पंढरपूर

चला पंढरीसी जाऊ, बाप रखुमा देविवरा पाहू, ज्ञानेश्वर माऊली तुकाराम, जय जय रामकृष्ण हरी...असा हरी नामाचा गजर करीत ’भक्ती रसात’ चिंब न्हाहून गेलेल्या जगद्गुरू संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्याने आज सोलापूर जिल्ह्यात प्रवेश केला. पालखीचे स्वागत जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी केले. जिल्हा प्रवेशानंतर अकलूज येथील सदाशिवराव माने विद्यालयाच्या प्रांगणात नेत्रदीपक असे गोल रिंगण झाले.

संत तुकाराम महाराज यांच्या पालखी स्वागतासाठी जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर, मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी, पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे,अकलूजचे उपविभागीय अधिकारी नामदेव टिळेकर, नगरपरिषदेचे मुख्याधिकारी दयानंद गोरे उपस्थित होते. हाती दिंड्या पताका, मुखात अखंड हरी नामाचा गजर आणि विठ्ठलाच्या दर्शनाची आस घेऊन भक्तिमय वातावरणात उन्हा-ताणाची तमा न बाळगता आपल्या लाडक्या विठ्ठलाचे रूप पाहण्यास व त्याच्या पायाचे दर्शन घेण्यासाठी पालखी सोहळ्यातील वारकरी पंढरीच्या वाटेवर लगबगीने चालत आहे. नीरा नदी ओलांडून संत तुकाराम महाराजांच्या पालखीचे सकाळी ८.३० वाजता माळशिरस तालुक्यातील अकलूज येथे आगमन झाले.

यावेळी संत तुकाराम महाराजांच्या अश्व आणि पादुकाचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. पालखी स्वागतापूर्वी पुणे जिल्हा प्रशासनाच्या वतीने जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांच्या पालखी सोहळ्यास भावपूर्ण निरोप देण्यात आला.

## सोलापूर जिल्ह्यात १९७ तलाठ्यांची होणार भरती

### जिल्हा प्रशासनात लगबग चालू; २६ ते १७ जुलै अर्ज स्विकृती

सुराज्य/सोलापूर



शासनाच्या आदेशावरून सरळ सेवा भरतीअंतर्गत राज्यात ४ हजार ६२५ तलाठ्यांच्या जागा भरल्या जाणार आहे त्यापैकी सोलापूर जिल्ह्यासाठी १९७ जागा भरण्यात येत आहेत. २६ ते १७ जुलै अर्ज स्वीकृती चालू होणार ऑगस्ट सप्टेंबर २०२३ महिन्यात ऑनलाइन परीक्षा होणार आहे. सोलापूर जिल्ह्यासाठी एकूण १७० आणि अनुकंपाखाली भरण्यात येणाऱ्या २० टक्के जागा अशा एकूण १९७ तलाठी पदांची भरती होणार आहे.

वेतनश्रेणी ९ हजार ३०० रुपयांचे बेसिक वेतन आहे. महागाई भत्ता व नियमाप्रमाणे इतर देय भत्ते असा ३४ हजार ८०० रुपये इतका पगार असणार आहे.

महाराष्ट्र शासनाच्या महसूल विभागांतर्गत तलाठी (गट-क) संवर्गातील ही भरती काढण्यात आली आहे. राज्यातील कोकण, पुणे, नाशिक, अमरावती आणि नागपूर अशा ६ विभागांत येणाऱ्या एकूण ३६ जिल्ह्यांत तलाठीपदाची भरती प्रक्रिया आहे. याबाबतची जाहिरात शासनाने प्रसारित केली आहे. भरतीसाठी कमीत कमी १८ वर्षे, तर जास्तीत जास्त ३८ वर्षे असलेला उमेदवार पात्र असतो. मागास व आरक्षित प्रवर्गासाठी पाच वर्षांची सूट देण्यात आली आहे. उमेदवारांचे अर्ज महाभूमी पोर्टलवर स्वीकारण्यात येणार आहे.परीक्षेसाठी खुल्या प्रवर्गातील उमेदवारांना एक हजार रुपये तर मागासवर्गीय प्रवर्गासाठी ९०० रुपये परीक्षा शुल्क आकारण्यात येणार आहे.

## विरवडे येथे वृद्धेचे हातपाय बांधून दरोडेखोरांनी दागिने लुटले

सुराज्य/सोलापूर

घरात चोरी केल्यानंतर वृद्ध महिलेच्या पायातील जोडवे काढून घेताना महिलेचे हातपाय बांधून तसेच तोंडात बोळा कोंबून दरोडेखोरांनी रोख रकमेसह १ लाख ९ हजार रुपये किमतीचे दागिने लुटून पोबारा केला.

हा धाडसी दरोडा विरवडे (ता.मोहोळ) येथे शुक्रवारी पहाटेच्या सुमारास घडला. विरवडे (ता.मोहोळ) येथे सुगलाबाई नारायण जावळे (वय ६५ ) या राहण्यास आहेत. उन्हाळा असल्याने त्या घराच्या दरवाजा समोर रात्री झोपल्या होत्या. पहाटे दोनच्या सुमारास दोघा दरोडेखोरांनी दरवाजा ढकलून घरात असलेल्या पेटीतील ३ हजार रुपये रोख आणि २६ ग्रॅम सोन्याचे दागिने चोरले होते. बाहेर जाताना त्यांनी सुगलाबाई यांच्या पायातील जोडवे काढून घेण्याचा प्रयत्न केला. त्यांना जाग आली असता दरोडेखोरांनी त्यांच्या तोंडात कापडाचा बोळा कोंबला. आणि त्यांचे हातपाय बांधून तेथून पोबारा केला. अशी नोंद कामती पोलिसात झाली. सहाय्यक निरीक्षक माने पुढील तपास करीत आहेत.



## माझी इमारत बेकायदेशीर असेल तर आवश्य पाडा

सुराज्य/सोलापूर




आ. सुभाष देशमुखांचे पटोलेंना आव्हान

माझी इमारत बेकायदेशीर असेल, महापालिकेने मला परवानगी दिलेली नसेल, तसेच वापर परवाना नसेल तर तात्काळ पाडा अशा शब्दांत भाजपचे माजी मंत्री सुभाष देशमुख यांनी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांना आव्हान दिले. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी शुक्रवारी कारखान्याला भेट दिल्यानंतर अप्रत्यक्षपणे आ. देशमुखांवर टीका केली होती. सुभाष देशमुखांचे घर अनधिकृत जागेत असल्याचा दावा पटोले यांनी केला होता. त्याला देशमुखांनी शनिवारी उत्तर दिले. आ. देशमुख म्हणाले, कारखान्याची चिमणी पाडण्याचा निर्णय हा न्यायालयाचा आहे. त्यावर माझ्यासारख्याने बोलणं उचित नाही.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



इथेच जास्त पाऊस पाडायचा आहे !

कल्याण

359-73-490

# शासकीय महापूजेच्या वेळीही विठ्ठलाचे मुखदर्शन सुरु राहणार

## घुसखोर व तथाकथित राजकारण्यांच्या मनमानीला लगाम

सुराज्य/पंढरपूर

आषाढी एकादशीला येणाऱ्या लाखो भाविकांसाठी शिंदे-फडणवीस सरकारने एक ऐतिहासिक निर्णय घेतला. विठ्ठल मंदिरात मुख्यमंत्र्यांच्या हस्ते जेव्हा शासकीय महापूजा सूरू असेल, त्यावेळी भक्तांना श्रीविठुरायाचे मुखदर्शन सुरूच ठेवण्यात येणार आहे. या निर्णयामुळे वारकऱ्यांना दर्शन रांगेत ताटकळत उभे राहाण्याची वेळ येणार नाही.

शासकीय महापूजेच्या चार तासांपूर्वीच दर्शनाची रांग बंद करण्यात यायची. त्यामुळे वारकऱ्यांमोठी मोठी गैरसोय व्हायची. कारण रांगेतला कालावधी चार तासांनी वाढायचा. वारकऱ्यांची ही गैरसोय टाळण्यासाठी यंदा हा निर्णय घेण्यात आला आहे.आषाढी एकादशीला मुख्यमंत्र्यांची पूजा सुरू असताना देखील मुखदर्शन सुरू राहणार आहे. पालकमंत्री विखे पाटील यांनी शुक्रवारी रात्री एका बैठकीत ही सूचना दिली. आषाढी एकादशीला मुख्यमंत्री पहाटे अडीच वाजता पूजेला येत असतात आणि जवळपास पहाटे पाचपर्यंत विठ्ठल रुक्मिणीची शासकीय पूजा आणि सत्कार कार्यक्रम मंदिरात होत असतो. यावेळी आषाढी सोहळ्याच्या इतिहासात पहिल्यांदाच अशी व्यवस्था केल्याने पर्वणी काळात जवळपास दीड ते दोन लाख भाविकांना देवाचे मुखदर्शन होणार आहे. मुख्यमंत्री शिंदे सरकारने एक धाडसी निर्णय घेत आषाढी एकादशीला मुख्यमंत्र्यांची पूजा सुरू असताना देखील मुखदर्शन देण्याचा निर्णय घेतला आहे. याचसोबत आषाढी एकादशीला मानाच्या दिंड्यांचे देण्यात येणाऱ्या दर्शन पासेसशिवाय कोणतेही व्हीआयपी दर्शन पासेस वितरित करू दिले जाणार नसल्याचेही विखे पाटील यांनी सांगितले आहे. यामुळे दर्शन रांगेत उभ्या राहणाऱ्या भाविकांना पहाटेची शासकीय महापूजा संपल्यानंतर दिवसभर विठुरायाचे दर्शन पर्वणी काळात घेता येणार आहे.



### घुसखोर व तथाकथित राजकारण्यांना चाप

राज्य सरकारच्या या निर्णयाचे वारकरी संप्रदायातून जोरदार स्वागत होत आहे. आषाढी यात्रेला आलेल्या जास्तीत जास्त भाविकांना एकादशी दिवशी दर्शन देण्यासाठी झालेला हा निर्णय यात्रेच्या इतिहासात पहिल्यांदाच घेण्यात आला आहे. यामुळे एकादशी दिवशी दिवसभर दर्शनासाठी घुसखोरी करणाऱ्या तथाकथित राजकारण्यांना मात्र चांगलाच चाप बसणार आहे. आषाढी एकादशीला व्हीआयपी बंदीची संपूर्ण व्यवस्था पोलिसांच्या ताब्यात दिली जाणार असल्याने मंदिर प्रशासन देखील यात हस्तक्षेप करू शकणार नाही.

# आता सोलापूर आरटीओ कार्यालयास नव्या अधिकाऱ्यांची प्रतिक्षा

सुराज्य/सोलापूर

- कोणत्या अधिकाऱ्यास मिळणार पहिला मान?
- कार्यालयाचा दर्जा वाढला

सोलापूरच्या उप्रादेशिक कार्यालयाचा दर्जा वाढला असून आता स्वत: प्रदेशिक कार्यालय म्हणून मान्यता मिळाली आहे. त्यामुळे आता नवीन आरटीओ कार्यालयास नव्या अधिकाऱ्यांची प्रतिक्षा आहे. संजय डोळस सेवानिवृत्त झाल्यापासून सोलापूर उपप्रदेशिक पदाचा अतिरिक्त पदभार गेली दिडवर्षापासून झाले पदभार अर्चना गाकयवाड यांच्याकडे आहे. त्यामुळे अता नव्या आरटीओ कार्यालयाचा स्वत: कारभार करण्याचा पहिला मान कोणत्या अधिकाऱ्यांला मिळतो यांची चर्चा चालू आहे.

राज्यातील उपप्रदेशिक परिवहन कार्यालयाचे प्रदेशिक परिवहन ( आरटीओ ) कार्यालयात रूपांतर करण्याचे आदेश राज्यशानाकडून काढले गेले. राज्यातील राज्याती नऊ उप्रदेशिक कार्यालयाचे रूपांतर केले आहे. यामध्ये सोलापूरच्या उपप्रदेशिक परिवहन कार्यालयाचा देखिल समावेश आहे. सोलापूरच्या कार्यालयास आरटीओचा दर्जा मिळावा यासाठी अनेक वर्षापासूनची प्रतिक्षा होती. ती शुक्रवारी राज्यशासनाने काढलेल्या आदेशामुळे पुर्ण झाली आहे. सोमवार पासून सोलापूरच्या उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाचा दर्जा वाढून आरटीओ म्हणुन कामकाजास सुरूवात केली आहे. सध्या सोलापूरच्या कार्यालयाचा पदभार गेली दिड वर्षापासून अकलुजच्या उपप्रादेशिक परिवहन अधिकारी अर्चना गाकयवाड यांच्याकडे आहे. त्यामुळे आता सोलापूरच्या नूतन आरटीओ कार्यालयास नव्या अधिकाऱ्यांची प्रतिक्षा आहे. सोलापूरचा पहिला आरटीओ अधिकारी होण्याचा मान कोणाला मिळणार याकडे लक्ष आहे. पिंपरी चिंचवड, जळगाव, सोलापूर, चंद्रपूर, अकोला, बोरीवली (मुंबई), अहमदनगर, वसई (जि. पालघर), सातारा या उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाचा दर्जा वाढ करत आरटीओ मध्ये समावेश झाला आहे. या नव्या मंजुरीमुळे सोलापूरच्या कार्यालयात आता आरटीओ हे नवीन अधिकाऱ्याचे पद रिक्त राहणार आहे. त्याशिवाय अकलूज उपप्रादेशिक परिवहन विभागाचा कारभर सोलापूर कार्यालयाच्या अधिन चालणार असल्याने सोलापूरचे उपप्रादेशिक अधिकाऱ्यांचे पद रिक्त राहणार आहे. त्यामुळे सोलापूरच्या कार्यालयास नव्या अधिकाऱ्यांची प्रतिक्षा आहे.




# न्यायालयीन कामकाजात तडजोडीने खटले संपवण्याचे आवाहन : न्या. चव्हाण

## माढ्यातील ऐतिहासिक इमारतीत दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तरचे थाटात उद्घाटन

सुराज्य/माढा

**न्यायालय हे न्यायधीश आणि वकिलांसाठी नसतात तर ते पक्षकारांसाठी असतात .अनेक वेळा न्यायालयीन कामाकाजात माणसे संपली त्यांचे वारस संपले मात्र खटले संपले नाहीत. न्यायालयीन निकाल कधी लागेल याची शाशवती नसल्याने पक्षकार वकील आणि न्यायव्यवस्था यांनी तडजोडीने खटले संपवले तर वेळ पैसा मानसिक त्रास वाचून वैर संपेल .यामुळे तडजोडीने खटले संपवण्याचे आवाहन मुंबई उच्च न्यातलयाचे न्यायमूर्ती पृथ्वीराज चव्हाण यांनी केले. माढ्यातील दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर या न्यायालयाच्या उद्गाटनप्रसंगी ते बोलत होते.**

न्यायमूर्ती चव्हाण पुढे म्हणाले, सर्व दुखाचे कारण अज्ञान असून महात्मा जोतीराव फुले आणि छत्रपती शाहू महाराजांच्या शैक्षणिक कार्याची महत्ती सांगितली.तत्कालीन काळात मूठभर शिकलेले लोक इतराना वेठीस धरून शोषण करायचे.म्हणून फुले यांचे कार्य मोलाचे ठरते. मात्र आजही शिक्षीत समाजात इगो हा विषय वादातीत असून यामुळेच अनेक दावे न्यायालयात येतात. यामुळे तडजोड करून प्रकरणे निकाली काढली तर वेळ पैसा मानसिक त्रास वाचतो आणि आपाआपसातील वैर कमी होण्यास मदत होते असे सांगितले.

मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती शिवकुमार डिगे यानी पक्षकार हाच न्यायव्यवस्थेचा केंद्रबिंदु असून गतिमान न्यायव्यस्थेसाठी वकिलांनी पुढाकार घेण्याचे आवाहन केले.यासाठी प्रलंबित खटल्यासाठी राज्य स्तरावर समन्वय समितीचे गठन करण्याचे आवाहन केले.यासाठी बार कौन्सीलचे सदस्य ॲड मिलींद थोबडे यांनी पुढाकार घेण्याचे आवाहनही केले.

जिल्हा सत्र न्यायाधीश डॉ शब्बीर औटी यांनी भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा युक्तीवाद झालेल्या माढ्याच्या ऐतिसाहासिक अशा न्यायालयीन इमारतीत नवीन वरिष्ठ स्तर न्यायलय सुरू झाल्याने सर्वाचे एक स्वप्न सत्यात उतरत असल्याचा आनंद यक्त केला. यावेळी विलंबाने मिळालाला न्याय हा न्याय नसतो यासाठी न्यायव्यवस्था गतीमान करण्याचे आवाहन केले.



महाराष्ट्र आणि गोवा बार कौन्सीलचे सदस्य ॲड मिलींद थोबडे यांनी अतिरिक्त न्यायालयाची मागणी करीत बदलत्या न्यायव्यवस्थेत वकिलांनी स्वतःला अद्यावत करीत न्यायदानावर लोकांचा विश्वास बसेल असे काम करण्याचे आवाहन केले.

यावेळी जिल्हा प्रथम सत्र न्यायाधीश डॉ शब्बीर औटी यांचा सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक माढा बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड आनंद कुलकर्णी यांनी केले. सूत्रसंचालन श्वेता हुल्ले यानी केले. कार्यक्रमास मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती तथा पालक न्यायमूर्ती पृथ्वीराज चव्हाण, शिवकुमार डिगे, जिल्हा प्रमुख न्यायाधीश डॉ. शब्बीर औटी, आमदार बबनराव शिंदे, आमदार संजयमामा शिंदे, माजी आमदार ॲड. धनाजीराव साठे, नगराध्यक्षा ॲड मिनलताई साठे, उपनगराध्यक्षा कल्पना जगदाळे, माजी जि प सदस्य झुंजार नाना भांगे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

# अक्कलकोट तालुक्यात जोरदार पाऊस; शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण

सुराज्य/अक्कलकोट

अक्कलकोट तालुक्यात आज हवामान विभागाने दिलेल्या अंदाजानुसार तालुक्याच्या तडवळ, कोर्से गाव,अंकलगी, खानापूर, शेगाव व गुड्डेवाडी,म्हैसलगी सह विविध भागात पावसाने हजेरी लावल्याने तालुक्यातील बळीराजा सुखावला आहे.कारण या पावसामुळे उकाड्याने हैराण झालेल्या नागरिकांना थोडासा दिलासा मिळाला आहे.

तालुक्यात अजून ही काही भागात अद्यापही पावसाची प्रतिक्षा कायम आहे.गेल्या काही दिवसांपासून हुलकावणी देणाऱ्या पावसाने आज सकाळपासून ढगाळ वातावरण होता,तर दुपारी नंतर अक्कलकोट शहर व तालुक्यात पावसाने हजेरी लावल्याने उस उत्पादक शेतकरी,फळबाग शेतकर्यांना धीर आला आहे. गेल्या काही दिवसांपासून शेतकऱ्यांना पावसाची प्रतीक्षा लागून होती. जून महिना संपत आला तरी पावसाचा पत्ता नव्हता .अखेर आज तालुक्यात काही भागात वरुणराजा बरसाला सुरुवात झाल्याने शेतकर्यांत थोडासा का होईना समाधान व्यक्त होत आहे. यंदा पावसाळा सुरु झाल्यापासून तालुक्यात पाऊस नसल्याने तापमानात वाढ झाला होता.यामुळे शेतकरी व सामान्य नागरिक उकाड्याने हवालदिल झाले होते. शेतकरी आकाशाकडे नजरा लावून पावसाच्या प्रतीक्षेत होता.शेवटी आज शेतकर्यांच्या दीर्घ प्रतीक्षेनंतर तालुक्यात वरुणराजाचा दर्शन झाल्याने शेतकर्यात आनंद व्यक्त होत आहे.कारण बहुतांश शेतकरी जून महिना कोरडा गेल्याने धास्तावले होते. सध्या तालुक्यात खरीप पूर्व मशागतीची कामे पूर्ण झाली आहे.



आता पेरणीसाठी शेतकरी सज्ज झाला आहे. तालुक्यात उशीरा का होईना पावसाला सुरुवात झाल्याने शेतकऱ्यांच्या आशा पल्लवीत झाल्या आहेत.यापुढे तालुक्यात समाधानकारक पाऊस झाल्यास खरीपाच्या पेरणीच्या कामांना वेग येणार आहे.

# पहिल्याच पावसाने सोलापूरकर सुखावले!

सुराज्य/सोलापूर

उन्हाने आणि उकाड्याचे बेजार झालेल्या सोलापूरकरांना पहिल्याच पावसाने सुखावले आहे. हुश्श एकदाच पडला पाऊस... अशा भावना सोलापूरकरांमधून व्यक्त होत होत्या. दुपारी तीन ते पाच या वेळेत पडलेल्या पावसाळमुळे शहराच्या सखल भागात पाणीच पाणी जमा झाले. यामुळे वाहनाधारकांची चांगलीच तारांबळ झाली. सकाळी आकाशात ढग झाल्याने सोलापूरकरांच्या नजरा आकाशाला लागल्या. पण दुपारी ११ नंतर उन्हाचा तडाखा सुरु झाला. यामुळे सोलापूरकर पुन्हा बेजार झाले. पण दुपारी ४ नंतर आकाशात ढगांचा माहोल तयार झाला आणि ५ च्या दरम्यान पावसाला जोरदार सुरुवात झाली. यामुळे सर्वांनीच नि:श्वास टाकला.

शहरातील कुंभार वेस, कोंतम चौक, गणेश पेठ, एस. टी. बसस्थानक परिसर, छ. शिवाजी चौक, जुना एम्प्लॉयमेंट चौक, बुधवार बाजार, भारतीय चौक, साखर पेठ, रविवार पेठ, भवानी पेठ, सम्राट चौक, बाळी वेस, पंजाब तालीम परिसर या सखल भागात रस्त्यावर पाणीच पाणी साचले होते.

याशिवाय शहराच्या हद्दवाढ भागातील अनेक कच्चे रस्ते चिखलमय झाल्याने नागरिकांना ये-जा करणे मुश्किल झाले होते. मजरेवाडी व जुळे सोलापूर भागातील अनेक नगरांमध्ये पाणी साचल्याचे दृश्य पहावयास मिळाले.

पावसाळ्यातील हा पहिल्याच पाऊस असल्याने अनेकांची पावसात भिजण्याचा आनंद लुटला. बच्चेकंपनी आपल्या घराच्या अंगणात पावसाचे थेंब अंगावर घेत नाचताना दिसून आली. दुकानदारांनी दुकानसमोर खुर्च्या टाकून न भिजता पाऊस पाहण्याचा आनंद लुटला. तर युवकमंडळी दुचाकीवर स्वार होऊन पावसात येथेच्छ भटकताना दिसून आली. सायंकाळी पाचनंतर ही शहराच्या बऱ्याच भागात रिमझिम पाऊस सुरुच होता. एकंदरच या पावसामुळे सोलापूरांना हायसे वाटले.

### गणेश पेठ शॉपिंग सेंटरसमोर ओढ्याचे स्वरुप

मंगळवार बाजार, गणेश पेठ शॉपिंग सेंटर समारील रस्त्याला तर ओढ्याचे स्वरुप आले होते. गणेश पेठ शॉपिंग सेंटरखालीच मोठा नाला असल्याने तो तुंबला गेला. पाण्याचा निचराच बंद झाल्याने येथे कमरेइतके पाणी साचले होते. येथे रस्त्याच्या बाजूला लावलेल्या अनेकांच्या दुचाकी गाड्या पाण्यात गेल्या. आपापल्या गाड्या वाचविता वाचविता दुचाकीस्वारांची दमछाक झाल्याचे दिसून आले. येथील एका पेट्रोल पंपावरही गुडघ्याच्या वर पाणी साचले होते.

# गायीच्या दुधासाठी उत्पादकांना लिटरला ३५ रुपये द्यावेत

## दुग्धव्यवसाय विकासमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांची घोषणा

सुराज्य/सोलापूर

दूध उत्पादकांना गायीच्या दूध खरेदीदरापोटी लिटरला किमान ३५ रुपये द्यावे लागतील. याबाबत फेरविचार होण्याची शक्यता वाटत नाही. यातील अडचणींचा अभ्यास करून आठवडाभरात अहवाल सादर करण्यासाठी एक समिती नेमली जाईल,'' अशी घोषणा महसूल, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकासमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी केली.

सहकारी दूध संघ व खासगी दुग्ध प्रकल्पाचालकांची बैठक झाले. यावेळी ते बोलत होते. शेतकऱ्यांच्या पाठीशी शासन ठामपणे उभे आहे. किमान ३५ रुपये त्याच्या पदरात पडले पाहिजेत.पशुखाद्याचे दरदेखील कमी व्हायला हवेत. अन्यथा शासनाला हस्तक्षेप करावा लागेल. शासनाच्या धोरणाला सहकारी व खासगी दुग्ध प्रकल्पांनी सहकार्य करावे,असे आवाहन विखे यांनी केले. खरेदीदर ३५ रुपयांपर्यंत नेण्यात अडचणी असल्याचे दूध उद्योगाच्या प्रतिनिधींनी यावेळी सांगितले. हा निर्णय सर्व अडचणींचा अभ्यास करीत व एकमताने घ्यायला हवा. अन्यथा दुग्धमंत्र्यांनी जाहिर केलेल्या दरापेक्षा कमी दराने खरेदी होत राहील. शासनाच्या शब्दाला महत्त्व राहण्यासाठी समिती नेमून दरवाढीबाबत धोरण ठरवावे, असे मुद्दे या प्रतिनिधींनी मंत्र्यांसमोरच मांडले. त्यावर समिती स्थापन करण्याची घोषणा मंत्र्यांनी केली.

### दुग्ध व पशुसंवर्धनविषयक झालेले निर्णय

दूध भुकटीची निर्यात केवळ एनडीडीबी'मार्फत होण्यासाठी केंद्राला प्रस्ताव देणार * दुधात भेसळ करणाऱ्यांवर आणि भेसळीचे दूध घेणाऱ्यांवरदेखील फौजदारी कारवाई होणार * भेसळ रोखण्यासाठी अन्न व औषध प्रशासन विभागाला आरे'चे २५० कर्मचारी पुरविणार * दूध भेसळ रोखण्यासाठी राज्यभर पथके नेमणार * एक रुपयात पीकविमाप्रमाणे १ ते ३ रुपयात पशुधन विमा देण्याच्या हालचाली * राज्यात शेळी–मेंढीविकासासाठी १० हजार कोटींची तरतूद. मेंढपाळांसाठी थेट अनुदान योजना तयार करण्याचे काम सुरू. * पशुखाद्याचे दर किमान २५ टक्के कमी करावेत; अन्यथा शासन हस्तक्षेप करणार * पशुखाद्याच्या पिशवीवर सर्व घटक व मात्रेचा तपशील नमुद करावा.



दुधाची भेसळ रोखण्यासाठी शासन अतिशय कडक पावले उचलेल. भेसळखोरांना थेट मोक्का' लावण्याच्या मताचा मी आहे.याबाबत कायदेशीर बाबी तपासून उपाय केले जातील. सहकारी किंवा खासगी प्रकल्पांनी भेसळीचे दूध खरेदी करीत पापात सहभागी होऊ नये. दूध भेसळ रोखण्यासाठी राज्यभर पथके नेमण्यात येतील. यात अतिरिक्त जिल्हाधिकारी, अतिरिक्त पोलिस अधीक्षक, अन्न व औषध प्रशासनाचे अधिकारी व पशू संवर्धन व दुग्ध व्यवसाय विकास विभागाचे अधिकाऱ्यांचा समावेश असेल, असेही या वेळी जाहिर करण्यात आले.

# बियामा मौलाना नदाफ यांचे निधन

नाझरे :



नाझरे (तालुका सांगोला) येथील बियामा मौला नदाफ यांचे शनिवार दिनांक २४ जुलै रोजी दुपारी एक वाजता अल्पशा आजाराने निधन झाले मृत्यूप्रसंगी त्यांचे वय वर्षे ८० होते

शिक्षक बंडू नदाफ व एसटी ड्रायव्हर सिकंदर नदाफ यांच्या त्या मातोश्री होत. त्यांच्या पश्चात चार मुले दोन मुली सुना नातवंडे असा मोठा परिवार आहे त्यांचा तिसरा दिवसाचा विधी सोमवारी सकाळी आठ वाजता नाझरे येथे होईल असे नातेवाईकांनी सांगितले



गजानन महाराजांची पालखी शनिवारी दमाणी नगर येथील अंधशाळेत विसाव्यासाठी थांबली होती. त्यावेळी हजारो भाविकांनी दर्शन घेतले. दुपारी ही पालखी पंढरीकडे प्रस्थान झाली.



तुकाराम महाराजांची पालखी शनिवारी जिल्ह्यात दाखल झाली. त्यावेळी स्वागत केल्यानंतर पालकमंत्री विखे-पाटील यांनी वारकऱ्यांसोबत फुगडी खेळली.

# पालखी मार्गावरील खाद्यपदार्थ, प्रसादांच्या दुकानाची तपासणी चालू

- प्रत्येक पालखी सोबत एक पथक ; शंभर दुकानांची झाली तपासणी
- १० किलो खराब बर्फी आणि तेल नष्ट; गजानन महाराज पालिकेच्या प्रसादाचे घेतले नमुने

सुराज्य/सोलापूर

आषाढी यात्रा कालावधित केल्या जाणाऱ्या खाद्यपदार्थात प्रसादाची तपासणी करण्यासाठी औषध प्रशासन सज्ज झाला आहे. प्रत्येक पालखी मार्गावरील खाद्यपदार्थ, प्रसादाची आणि दुकानाची तपासणी केली जात आहे. दोन दिवसात पालखी मार्गावरील आणि मुक्कामांच्या ठिकाणी शंभर दुकानांतील खाद्यपदार्थची तपासणी केली आहे. त्यामध्ये १० किलो खराब बर्फी आणि १० किलो तेल नष्ट केले आहे. सोलापूरात देखिल गजानन महाराज पालाखी सोहळ्यात वाटप केलेलेल्या महाप्रसादचे नमुने तपासणी साठी ताब्यात घेतले आहेत.

पंढरपूरच्या आषाढी यात्रा कालीवधीमध्ये मोठ्या प्रमाणात भाविक येतात. त्याचबरोबर विविध पालख्या देखील पंढरपुरात दाखल होतात. पालखी सोबत येणाऱ्या भाविकांना खरेदी केलेल्या अथवा महाप्रसाद म्हणून वाटप केलेल्या खाद्यपदार्थ आणि महाप्रसादाच्या माध्यमातून विषबाधा होऊ नये म्हणून सोलापूर अन्न औषध प्रशासनाच्या वतीने विशेष दक्षता घेण्यात आली आहे. यात्रा कालावधित पंढरपुरात प्रत्येक पालखी मार्गावर एक पथक नियुक्ती केली आहे. गेल्या तीन दिवसापासून आता पर्यंत या पथकांच्या माध्यमातून शंभर दुकानांची तपासणी केली आहे. जेऊर कंदर पालखी मार्गावरील २० दुकाने तर नातेपुते पालखी मार्गावरील १९ तपासणी करत चार नमुने ताब्यात घेतले आहेत. संत गजानन पालखी मार्गावरील तिऱ्हे मध्ये १९ दुकाने तपासली आहेत. नातेपुते पालखी मार्गावरील १९ दुकाने पंढरपुरात २५ दुकानांची तपासणी करत १३ नमुने ताब्यात घेतले आहेत. माढा, शेटफळ आणि आष्टी २० दुकाने तपासणी करत ७ नमुने ताब्यात घेतले आहेत.



यात्रा कालावधित मोठ्या प्रमाणात तपासणी करण्यासाठी औरगांबाद येथून फिरती प्रयोगशाळा असलेली व्हॉन पंढरपुरात दाखल होणार आहे. ती गाडी निघाली असून सोमवारी पंढरपुरात दाखल होणार आहे. त्याशिवाय इतर जिल्हातील २५ अन्नसुरक्षा अधिकाऱ्यांची अतिरिक्त कुमक पंढरपुरात दाखल होणार आहे.

---

शुक्रवारी नातेपुते, माळशिरस येथे पथकांच्या माध्यमातून केलेल्या तपासणी मध्ये १० किलो खराब बर्फी सापडली आहे. सदर बर्फी ताब्यात घेऊन नष्ट केली आहे. तसेच पंढरपुरात टीपीसी मशिनच्या माध्यमातून केलेल्या तपासणी मध्ये खराब तेला मध्ये खाद्यपदार्थ तळत असल्याने हे तेल ताब्यात घेऊन खराब तेल नष्ट केले आहे.

---

यात्रा कालावधीत खाद्यपदार्थ, प्रसादाची दुकाने यांच्या वेळोवेळी तपासण्या केली जाणार आहे. तसेच मठ व धर्मशाळा येथे मोठ्या प्रमाणात अन्न व फराळाचे पदार्थ बनविण्यात येतात यांची देखिल तपासणी केली जाणार आहे. यासाठी तपासणी पथके तैनात केली आहेत.

**- प्रदिप राऊत** ( सहाय्यक आयुक्त अन्न व औषध प्रशासन)

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R.N.I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail.com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

# एकनाथ महाराज पालखी सोहळा संत सावतोबाच्या भक्तीच्या मळ्यात विसावला

✔ सुराज्य/तानाजी इंगळे

**संत एकनाथ महाराज यांचा आषाढी वारी पालखी सोहळा शनिवारी संत शिरोमणी सावता महाराज मंदिरात विसावला. हा पालखी सोहळा पैठणपासून २५० किमीचे अंतर पायी पार करत ,५ रिंगण सोहळे सादर करुन लवूळ येथील विठ्ठल भक्त संत कुर्मदासांच्या समाधी चे दर्शन घेऊन शनिवारी सावता महाराजांच्या भेटीसाठी अरण मध्ये दाखल झाला.**

पैठणहून आलेल्या दिंड्या व पालख्यांनी सावतोबांचा भक्तिचा मळा फुलुन गेला. सर्वत्र विठूनामाचागजर होत होता.भानुदास एकनाथ असे म्हणत वारक-यांनी गावातील रस्त्यावर फेर धरला.गावात आल्यावर पालखी चे स्वागत देवस्थान चे अध्यक्ष विठ्ठल गाजरे,सचिव अँड विजय शिंदे, जिल्हा परिषद सदस्य भारत आबा शिंदे, समाज कल्याण चे सभापती शिवाजी कांबळे यांच्या सह अरणमधील पदाधिकारी नेतेमंडळी व ग्रामस्थांनी केले. गावातून पालखी ची सवाद्य मिरवणूक काढण्यात आली,रस्त्यावर रांगोळी पायघड्या अंथरण्यात आल्या होत्या.

दरवर्षीप्रमाणे पालखी सोहळा प्रमुख रघुनाथ महाराज गोसावी यांच्या मार्गदर्शनाखाली पैठणहून पंढरपूरास निघालेल्या ३५ हून अधिक पायीदिंड्या सोहळयात सहभागी झाल्या असून,१८,००० वारकरी भक्त पायी विठ्ठल भेटीला पंढरपूरपुरास चालत निघाले आहेत. नाथांच्या पादुकासोबत आषाढी वारीचा आनंद वारकरी मोठ्या भक्ती भावाने घेत आहेत. पालखीसोबत पाठीमागे तीस दिंड्या व पालखी पुढे पाच दिंड्यातील वारकरी व इतर दिंड्या शिस्तीने चालत,भजन करीत, अभंग गायक करीत आहेत. पालखी सोहळा नियोजनाबरोबरच पालखी सोहळ्यासोबत योगेश महाराज पालखीवाले, रखमाजी महाराज नवले, नामदेव बुवा ऊगले, गंगाराम महाराज राऊत, भानुदास महाराज शेळके, भानुदासबुवा पुरुषोत्तम, पांडुरंग महाराज, चंद्रकांत खेडकर, बाळा मुरुडेश्वर, तळपे महाराज खेडकर, वाहेगावकर महाराज हे दिंड्यांचे प्रमुख पायी चालत आहेत. अरणमध्ये नाथपादुकांना रविवारी सकाळी सावता महाराज समाधी सोबत कुलकर्णी कुटुंबियांकडून महाअभिषेक संपन्न होईल दुपारी हा पालखी सोहळा पंढरपूर साठी प्रस्थान ठेवेल.



## ३५ हून अधिक पायीदिंड्या सोहळ्यात सहभागी ; १८,००० वारकऱ्यांची उपस्थिती

### रेल्वे पटरी वारकऱ्यांनी रथासह ओलांडली

श्रीसंत एकनाथ महाराज पालखी सोहळ्याच्या मार्गावर असलेल्या सोलापूर जिल्ह्यातील कुडू परिसरातील रेल्वे पटरी वारकऱ्यांनी रथासह ओलांडली. यावेळी कुर्डुवाडी रेल्वे प्रशासन व पोलिस विभागाकडून योग्य ते खबरदारी घेण्यात आली.श्रीसंत एकनाथ महाराज पालखी सोहळ्याचा तेरावा मुक्काम बिटरगाव येथील गुरुवारी पंचक्रोशीत झाल्यानंतर चौदाव्या मुक्कामासाठी सकाळी संत एकनाथ महाराज पालखी सोहळ्याचे प्रस्थान कव्हेदंड येथे करण्यात आले. तर पालखी सोहळ्याचे चौथी रिंगण भानुदास एकनाथ जयघोषात मोठ्या उत्साहात झाले. संत एकनाथ सोहळ्यातील रथासह वारकऱ्यांनी या पालखी मार्गावरील रेल्वे पटरी ओलांडली. कुर्डुवाडी रेल्वे प्रशासनाकडून कुर्डु गावाला जाण्यासाठी दरवर्षीप्रमाणे यंदा देखील तात्पुरत्या स्वरूपात रेल्वे पटरी ओलांडण्याची व्यवस्था करून देण्यात आली.



### तिसऱ्या क्रमांकाचा पालखी सोहळा

महाराष्ट्रातील हा तिसऱ्या क्रमांकाचा पालखी सोहळा आहे. माऊली ज्ञानेश्वर महाराज व संत तुकाराम महाराज यांच्या सोहळ्या प्रमाणेच शांतिब्रह्म एकनाथ महाराजांचा पालखी सोहळा मोठ्या उत्साहात साजरा होतो आहे. सोहळ्यामध्ये वारकऱ्यांचा व दिंडी यांचा सहभाग दरवर्षी वाढतो आहे. या सोहळ्यात सर्व सोई सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. या सोहळ्याची शोभा वाढवावी असा संदेश वारकरी संप्रदायातील संबंधीत फडकरी प्रमखांना यावेळी ह.भ.प. योगेश महाराज गोसावी यांनी दिला.



## मुक्तेश्वर मंदिर ट्रस्टतर्फे गुणवंतांचा सत्कार

✔ **सोलापूर** : श्री मुक्तेश्वर मंदिर ट्रस्टतर्फे सोमवंशी आर्य क्षत्रिय समाजातील १० वी व १२ वी च्या परीक्षेत यश मिळालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. हा कार्यक्रम मुक्तेश्वर मंदिर, टिळक चौक येथे पार पडला. यावेळी ओमप्रकाश चव्हाण, उद्योगपती नंकूमार श्वचतापुरे होते. कार्यक्रमासाठी समाजातील युवकांनी मंडळाने परिश्रम घेतले. सूत्रसंचलन सुभाष गवळी यांनी केले.



## प्रसन्न आत्मियतेवर समर्थांचे वरदहस्त : न्या. भोसले

✔ **अक्कलकोट** : स्वामी समर्थांच्या भक्तिने मन अत्यंत प्रसन्न होते. त्यांच्या नामस्मरणाने आपल्या आत्मीयतेला सकारात्मक ऊर्जा मिळते. त्यामुळे प्रसन्न चित्ताने स्वामी भक्तिचा आनंद घेता येतो. म्हणून आमच्या प्रसन्न आत्मीयतेवर स्वामी समर्थांचे वरदहस्त नेहमीच असल्याचे मनोगत अलाहाबाद उच्च न्यायालयाचे माजी मुख्य न्यायमूर्ती दिलीप भोसले यांनी व्यक्त केले. ते नुकतेच येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरास सपत्निक भेट देऊन श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेतले. यावेळी मंदिर समितीच्या वतीने समितीचे चेअरमन नगरसेवक महेश इंगळे यांनी त्यांचा सन्मान केला. याप्रसंगी अक्कलकोटचे न्यायाधीश बाळासाहेब गायकवाड, ॲड. अनिल मंगरुळे, पोलीस निरीक्षक जितेंद्र कोळी, पोलीस उपनिरीक्षक श्री पुजारी, स्वप्नील मोरे, अविनाश सुरवसे, धनु राठोड, मंदिर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, निलेश पवार, प्रभाकर जाधव, मोहन जाधव आदी उपस्थित होते.



## जाधव वस्ती जि. प. शाळेतर्फे बालदिंडीचे आयोजन

✔ **पिलीव** : माळशिरस तालुक्यातील पिलीव परीसरातील जाधव वस्ती जि.प. शाळेत बालदिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये बाल चमुंनी वारकऱ्यांच्या हुबेहुब वेशभुषेत सहभाग घेतला. .या दिंडीतील लहान सहभागी वारकऱ्यांनचे स्वागत दत्तु जाधव, श्रीरंग जाधव,अशोक जाधव,अमीत पिसे,राहुल जाधव, दिपक जाधव या पालकांनी केले. विठु माऊलीचा जयघोष करीत दिंडी संपुर्ण जाधवस्ती परीसरात काढण्यात आली. दिंडीचे आयोजन शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष बाजीराव जाधव, शशिकांत जाधव,उत्तम जाधव,संदीप जाधव,वसंत जाधव, प्रकाश पिसे,तानाजी फुले,राजु जाधव व शिक्षक यांनी केले होते. सर्वांनचे शिक्षक चंद्रकांत धसाडे यांनी आभार मानले.

## फुले-आंबेडकरी कार्यकर्त्यांचा जागर मेळावा होणार : शिंदे

✔ **सोलापूर** : दलित पँथर सुवर्ण महोत्सव समारोह समिती सोलापूर च्या वतीने येत्या २७ जुलै रोजी सोलापुरात फुले आंबेडकर कार्यकर्त्यांचा जागर मेळावा आयोजित केला जाणार असल्याची माहिती मेळाव्याचे स्वागत अध्यक्ष व सोलापूर जिल्ह्याचे दलित पँथर चे माजी अध्यक्ष माननीय अंबादास शिंदे यांनी दिली आहे.

प्रारंभी मेळाव्याचे संयोजक कीर्तीपाल गायकवाड व मेळाव्याचे कार्याध्यक्ष जनार्दन शिंदे यांनी फुले आंबेडकर कार्यकर्त्यांचा मेळावा घेण्याचा उद्देश सांगितला. निमंत्रक बाबू बनसोडे यांनी दलित पँथरच्या सुवर्ण महोत्सवा निमित्त ग्रंथ प्रकाशित होणार असल्याचे जाहीर केले.

## मोदींच्या नेतृत्वाखाली देशाचा होतोय चौफेर विकास

### सोशल मीडियावरील प्रभावशाली नेटकऱ्यांची भावना

✔ सुराज्य/सोलापूर

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली हिंदुस्थानचा चौफेर विकास होत आहे. त्यांच्याच नेतृत्वात देश आगामी काळात आणखी प्रगती करेल, असा विश्वास सोशल मीडियावरील प्रभावशाली नेटकऱ्यांनी व्यक्त केला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पंतप्रधान पदाच्या कार्यकाळास नऊ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल आयोजित करण्यात आलेल्या सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर संवाद कार्यक्रमात भाजपाचे सोशल मीडिया प्रदेश संयोजक प्रकाश गाडे यांनी शनिवारी हॉटेल सेंटर पॉइंट येथे सोलापूरातील नेटकऱ्यांशी संवाद साधला. याप्रसंगी व्यासपीठावर खा. डॉ. जयसिध्देश्वर महास्वामी, माजी सहकारमंत्री आ. सुभाष देशमुख, भाजपाचे शहराध्यक्ष विक्रम देशमुख, माजी नगरसेवक डॉ. किरण देशमुख, जिल्हा संघटन सरचिटणीस शशिकांत चव्हाण, शहर संघटन सरचिटणीस रुद्रेश बोरामणी, सोशल मीडिया संयोजक योगेश गिराम, विकास वाघमारे, प्रवीण कांबळे उपस्थित होते.




प्रकाश गाडे म्हणाले, २०१४ ते २०२३ या नऊ वर्षात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशाचा मोठा विकास झाला आहे. ही कामे सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचण्याची आवश्यकता आहे. कोरोना काळात युरोपीय देशात आरोग्य व्यवस्थेचा बोजवारा उडालेला असताना भारतात मात्र आरोग्य यंत्रणेने तुलनेने उत्तम काम केले. गेल्या नऊ वर्षात रोजगारही वाढलेला आहे. याची माहिती सर्वसामान्य जनतेला करून देणे आवश्यक आहे, असेही श्री गाडे म्हणाले.

यावेळी सोशल मीडियावरील प्रभावशाली नेटकऱ्यांनी भारतीय जनता पार्टीने देशभर केलेल्या विकासाबाबत आपली मते मांडली. तसेच समाजाच्या सर्वांगीण विकासाबाबत उपयुक्त सूचनाही केल्या. भाजपाचे शहराध्यक्ष विक्रम देशमुख यांनी प्रास्ताविक केले. भाजपा अनुसूचित जाती मोर्चाचे प्रवीण कांबळे यांनी सूत्रसंचालन तर सोशल मीडिया संयोजक योगेश गिराम यांनी आभार प्रदर्शन केले. याप्रसंगी भाजपा शहर व ग्रामीण सोशल मीडिया टीम, सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर्स, यूट्यूबर्स आदी उपस्थित होते.

## आंतरजिल्हा बदलीने आलेले शिक्षक अजूनही गॅसवरच

### नियुक्ती केली पण आदेश दिले नाहीत; जि.प. प्रशासनाचा अजब कारभार

✔ सुराज्य/सोलापूर

आंतरजिल्हा बदली होऊन जिल्ह्यात ९३ शिक्षक आले आहेत. चार दिवसांपूर्वी झालेल्या समुपदेशनात त्यांना शाळा नियुक्त करण्यात आल्या. मात्र, शिक्षकांना नियुक्ती आदेश देण्यात आले नाहीत. त्यामुळे आंतरजिल्हा बदली होऊन आलेले शिक्षक वैतागले आहेत.

शैक्षणिक वर्ष २०२३-२४ सुरू झाले असून जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या सुमारे अडीच हजार शाळा सुरू झाल्या आहेत. यातील अनेक शाळांमध्ये शिक्षकांच्या जागा रिक्त आहेत. त्या रिक्त शाळेमध्ये नियुक्ती आदेश द्यावे, अशी मागणी आंतरजिल्हा बदलीने आलेल्या शिक्षकातून होत आहे. त्यासाठी जिल्हा परिषदेतील प्राथमिक



शिक्षण विभागाने आंतरजिल्हा बदलीने आलेल्या शिक्षकांचे समुपदेशन ही केले आहे. मात्र, त्यांना शाळेवर रुजू व्हायचे हे आदेश अद्याप दिले नाही. त्यामुळे शिक्षकांना शाळेवर हजर होण्यासाठी अडचण ठरत आहे.

१५ जून पासून शाळा सुरू झाल्या आहेत. जिल्ह्यातील ४८ शाळेमध्ये एक ही शिक्षक नाही तसेच १७४ शाळांमध्ये एकच शिक्षक शाळांमध्ये शिक्षण देत आहे. विद्यार्थ्यांचे मोठ्या प्रमाणात शैक्षणिक नुकसान होत असून जिल्हा शिक्षण विभागाने लक्ष देणे गरजेचे असल्याच्या भावना पालक व्यक्त करीत आहेत.

आंतरजिल्हा बदली होऊन आलेल्या शिक्षकांचे समुपदेशन झाले आहे. त्यांना शाळेवर नियुक्ती आदेश देण्याची फाईल मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे गेली असून त्यांची सही होताच सर्व शिक्षकांना नियुक्ती आदेश देण्यात येईल, असे शिक्षण विभागाकडून सांगण्यात आले. मात्र अशा प्रकारची प्रोसेस गेल्या पंधरा दिवसापासून सुरू आहे. आम्ही रोज मुख्यालयात येतो आणि जातो त्यावर अद्याप प्रशासनाने कुठलेही कारवाई केल्याचे दिसत नसल्याचे खंत शिक्षकांनी बोलून दाखवले.



## ग्रीन फिंगर्स आयुर्वेदिक हॉस्पिटलतर्फे वारकऱ्यांची तपासणी

✔ सुराज्य/अकलूज

आ.रणजितसिंह मोहिते-पाटील व श्री शिवपार्वती सार्वजनिक विकास ट्रस्ट शंकरनगर अकलूजच्या उपाध्यक्षा सत्यप्रभादेवी मोहिते-पाटील यांच्या मार्गदर्शनपर ग्रीन फिंगर्स आयुर्वेदीक हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर या हॉस्पिटल यांच्या वतीने आषाढी वारी पालखी सोहळयात अकलूज व सदशिवनगर या ठिकाणी २३ जून व २४ जून रोजी मोफत आरोग्य तपासणी व उपचार शिबीर घेण्यात आले.

४१० भाविकांवर मोफत उपचार करण्यात आले.अकलूज मधील शिबीर हे शिवरत्न मोटर्स येथे आणि सदाशिवनगर येथील शिबिर हे शंकर कारखाना गेस्ट हाऊस येथे घेण्यात आले होते. या शिबिरास अर्जुनसिंह मोहिते-पाटील,विश्वतेजसिंह मोहिते-पाटील यांनी सदिच्छा भेट दिली.

## स्वेरीत अभियांत्रिकी प्रवेशासाठी ऑनलाईन रजिस्ट्रेशन प्रक्रिया सुरु

✔ सुराज्य/पंढरपूर

'प्रथम वर्ष अभियांत्रिकी (पदवी) च्या प्रवेशासाठी ऑनलाईन रजिस्ट्रेशन प्रक्रिया दि.२४ जून २०२३ पासून सुरु झाली आहे. राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडून स्वेरी अभियांत्रिकीला फॅसिलिटेशन सेंटर (एफ.सी. ६२२०) म्हणून मान्यताही मिळालेली आहे. ही रजिस्ट्रेशन प्रक्रिया दि.०३ जुलै २०२३ (सायं. ५.००) पर्यंत चालणार आहे.' अशी माहिती स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे यांनी दिली.

महाराष्ट्र शासनाच्या राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या https://cetcell.mahacet.org या संकेतस्थळावर प्रवेश प्रक्रियेबाबत सविस्तर माहिती देण्यात आलेली आहे. स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांच्या नियोजनात्मक मार्गदर्शनाखाली स्वेरी अभियांत्रिकी मध्ये ऑनलाईन रजिस्ट्रेशनची सुविधा मोफत उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. या प्रवेश प्रक्रियेच्या पहिल्या टप्प्यात ऑनलाईन रजिस्ट्रेशन करणे, मूळ कागदपत्रे अपलोड करणे आदी बाबींचा समावेश आहे. नोंदणी यशस्वीपणे आणि बिनचूकपणे केलेले विद्यार्थीच शासनाच्या कॅप राऊंडसाठी पात्र राहतील. कॅप राऊंड मधून प्रवेशित विद्यार्थीच शासनाच्या वेगवेगळ्या सवलती घेण्यास पात्र राहतील. पालकांनी स्वेरीत येऊन ही प्रक्रिया येथील तज्ञ शिक्षकांमार्फत पूर्ण करून घ्यावी.' असे आवाहन प्रवेश प्रक्रियेचे अधिष्ठाता प्रा.करण पाटील यांनी केले आहे.

## प्रभाग २२ मध्ये पाणी पुरवठ्याची समस्या सोडवा : जाधव

✔ सुराज्य/सोलापूर

प्रभाग २२ मध्ये विस्कळीत पाणीपुरवठा व दूषित पाणी पुरवठा होत आहे. नागरिकांच्या तक्रारींनंतर प्रभाग माजी नगरसेवक किसन जाधव व नागेश गायकवाड यांनी महापालिकेच्या अधिकाऱ्यांना प्रभागात बोलवत ही समस्या सोडवण्याची मागणी केली.

पि. एच. इ. विभागाचे अवेक्षक विपत साहेब, झोन क्रं.७ चे अवेक्षक भोसले व एजाज शेख, झोन क्रं.६ चे अवेक्षक गाईधनकार, संजय कोळी, इलाही शेख, चावी वाले फुलारी व कांबळे आदींना जाधव यांनी प्रभागात बोलावले. रामवाडी रिक्षा स्टॉप ते अंबाबाई मंदिर, रामवाडी पारसी बंगला, पोगूल माळा या सर्व ठिकाणी अधिकाऱ्यांना घेऊन जाऊन जाधव यांनी समक्ष जनतेचे गाऱ्हाणे सर्व अधिकाऱ्यांच्या कानावर घातले व लवकरात लवकर या अडचणी चे निवारण झाले पाहिजे असे अधिकाऱ्यांना बजावून सांगितले.



### अधिकाऱ्यांनाच बोलावून नेले जनतेपर्यंत

अधिकाऱ्यांनी लवकरात लवकर या समस्येचे निराकरण करण्यात येईल अशी ग्वाही दिली. यावेळी राष्ट्रवादी युवक प्रदेश सरचिटणीस चेतन नागेश गायकवाड, ज्ञानेश्वर जाधव, तोडदार, अशोक जाधव, हवालदार चाचा, नागेश जाधव, अनिश जाधव, फिरोज शेख, वसंत कांबळे, चंदाताई जाधव, जैतुन अपा, चंदा स्वामी, स्वाती जाधव, तसेच नागरिक उपस्थित होते.

## इंद्रभुवन येथे छायाचित्र व पेंटिंग प्रदर्शनाचे आयोजन

✔ सुराज्य/सोलापूर

स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कार्पोरेशनच्या आठव्या वर्धापन दिनानिमित्त इंद्रभवन येथे छायाचित्र व पेंटिंग प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रदर्शनाचे उद्घाटन खासदार डॉ. जयसिद्धेश्वर शिवाचार्य महास्वामी यांच्या भहस्ते तर आमदार सुभाष बापू देशमुख प्रमुख उपस्थितीत झाले. यावेळी महापालिकेचे आयुक्त शीतल तेली-उगले यांची प्रमुख उपस्थिती होती.

या प्रदर्शनामध्ये सोलापूर शहर व संस्कृतीचा या विषयावर प्रदर्शन भरवले आहे.यात सोलापुरातील जुने वाडे,मंदिर, कामगारांचे चाळ, धार्मिक उत्सव, सिद्धेश्वर यात्रेचे छायाचित्र व चित्र तयार केले असून या प्रदर्शनात सोलापूरच्या संस्कृतीचे दर्शन घडत आहे.या प्रदर्शनात डॉ. कोटणीस यांचे स्वतंत्र दालन उभे करण्यात आले आहे. शहीद अशोक कामटे, शहीद राहुल शिंदे, कवी रा.णा पवार, निर्मलकुमार फडकुले यांचेही शिल्प या ठिकाणी ठेवण्यात आलेले आहेत. या प्रदर्शनात एकूण १३ चित्रकारांनी सहभागी नोंदवले आहेत. प्रदर्शन पाहण्यासाठी कला रसिकांचा उत्तम प्रतिसाद मिळत आहे.




### स्मार्टसिटीचा आठवा वर्धापन दिन

यावेळी अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे,नगर अभियंता लक्ष्मण चलवादी, सार्वजनिक आरोग्य अभियंता विजय राठोड, स्मार्ट सिटीचे तांत्रिक अधिकारी व्यंकटेश चौबे, मुख्य लेखापाल रूपाली कोळी, आर्किटेक शशिकांत चिंचोळकर,प्रदीप जोशी,युवराज गाडेकर, राहुल कुलकर्णी, सुनिता हिबारे तसेच चित्रकार विठ्ठल मोरे, देवेंद्र निम्बर्गीकर,प्रवीण रणदिवे,मल्लिकार्जुन सालिमठ,सचिन गायकवाड, पौर्णिमा शहरवाले, धनराज काळे, मयूर हिंगणेकर अंजली स्वामी, वर्षा बाकळे,(छायाचित्रकार ) यशवंत सादुल, अमरनाथ कणकी, नितीन जाधव आदी मन्यावर उपस्थित होते.

हे प्रदर्शन हे २७ जून २०२३ पर्यंत इंद्र भवन येथे सुरू असून यासाठी सोलापूर शहरातील नागरिकांनी प्रदर्शनास भेट द्यावे असे आव्हान स्मार्ट सिटी चे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा आयुक्त शीतल तेली-उगले यांनी केले.

## गुरुपौर्णिमेनिमित्त कोळे येथील महास्वामींच्या मठात कार्यक्रम

✔ सुराज्य/नाझरे

गुरुपौर्णिमेनिमित्त कोळे (ता. सांगोला) येथील कोळेकर महास्वामींच्या मठात ३० वे मठाधिपती गुरु निर्वाण रुद्र पशुपती कोळेकर महास्वामीजी यांच्या गुरुत्वाखाली व उत्तराधिकारी एकविसावे मठाधिपती गुरू निर्वाणरुद्र पशुपती कोळेकर महास्वामीजी यांच्या उपस्थितीत २६ जून ते सोमवार ३ जुलै अखेर अखंड शिवनाम सप्ताह व परम रहस्य ग्रंथाचे पारायण तसेच शिवदीक्षा विधी सोहळ्याचे भव्य आयोजन केले आहे.



यावेळी श्री श्री श्री१०८ चंद्रशेखर शिवाचार्य महासोलीकर महाराज व श्री महादेव महाराज हिंगणगाव ता कवठेमंकाळ हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. रोज विविध मंडळांचे भजन, किर्तन होणार आहे. ३ रोजी सकाळी आठ वाजता भव्य दीक्षाविधी सोहळ्याचे आयोजन केले आहे. गुरु आशीर्वाचन धर्मसभा तसेच गुरुपौर्णिमेचा औदुंबर नरोळे यांचा महाप्रसाद व कोळेगावातून महास्वामींची मिरवणूक निघेल. शिवभक्तांनी उपस्थित रहावे, असे आवाहन वीरशैव तरुण मंडळ व ग्रामस्थ कोळे यांनी केले आहे.

# केंद्र व राज्य सरकारच्या माध्यमातून दक्षिणमध्ये ४१० कोटींची कामे पूर्ण


सुराज्य/दक्षिण सोलापूर

**गेल्या नऊ वर्षात पंतप्रधान नरेंद्र मोदी सरकारने देशभरात वीज,रस्ते,पाणी, आरोग्य ,घरकुल,स्मार्ट सिटी,चौपदरी रस्ते या इतर क्षेत्रात हजारो कोटीचे विकासकामे केली आहेत. तर गेल्या एक वर्षात आपण आमदार म्हणून सोलापूर दक्षिण विधानसभा मतदारसंघात ४१० कोटी रुपयांची विकास कामे केली आहे अशी माहिती आमदार सुभाष देशमुख यांनी पत्रकार परिषदेत दिली.**

सोलापूर येथील विकास नगर मध्ये त्यांच्या संपर्क कार्यामध्ये आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते यावेळी मंचावर भाजपचे दक्षिण सोलापूरचे तालुकाध्यक्ष रामाप्पा चिवडशेट्टी, ज्येष्ठ नेते हनुमंत कुलकर्णी व आप्पासाहेब मोटे उपस्थित होते.

आमदार सुभाष देशमुख म्हणाले, केंद्र सरकारच्या माध्यमातून सोलापूर जिल्ह्यात ८ हजार तर ग्रामीण भागामध्ये २२ हजार ४९७ घरकुल मंजूर आहेत. पी.एम स्वनिधींतर्गत २२ हजार ४९७ लाभार्थ्यांना लाभ मिळाला मुद्रा योजनेतून २ लाख ३९ हजार ७५१ लाभार्थ्यांना १६९३ कोटी रुपये वाटप करण्यात आले.पीएम किसान सन्मान निधी योजनेतून ६ लाख ४० हजार शेतकऱ्यांना प्रतिवर्षी सहा हजार रुपये अनुदान दिले.३ हजार १२७ कोटी रुपये खर्चून राष्ट्रीय चौपदरीकरण रस्ते केले. भारतमाता प्रकल्पातून ४४७ किमी लांबीचे रस्ते साठी१५९२ कोटी मंजूर आहेत. प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत १७३ कोटी तर रे नगर प्रकल्प अंतर्गत ३० हजार घरांचा प्रकल्प पूर्णत्वास येत आहे. सोलापूर स्मार्ट सिटी अंतर्गत ९९५ कोटींची कामे पूर्ण आहेत. सोलापूर विद्यापीठामध्ये इंनडोअर स्पोर्ट्स स्टेडियम साठी साडेचार कोटी मंजूर आहेत जलजीवन मिशन अंतर्गत ७७ हजार घरांना नळाद्वारे पाणीपुरवठा केला आहे. प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना अंतर्गत १४ लाख ९८ हजार १३, प्रधानमंत्री सुरक्षा बीमा योजना अंतर्गत ६ लाख ३१ हजार प्रतिनिधींनी तर अटल पेन्शन योजनेचा २५ हजार ७६० जणांनी लाभ घेतला आहे.

प्रधानमंत्री जनधन योजना १५ लाख ७१ हजार जणांनी खाते उघडले आहे.३ हजार ७७८ कोटी रुपयाचा कृषी कर्ज पुरवठा करण्यात आला आहे. १ हजार ३९३ लोकांना पशु कर्ज दिले आहे. सोलापूर शहरात दोन उड्डाण पूल मंजूर आहेत आयुष्यमान भारत योजना अंतर्गत १० लाख लाभार्थी आहेत त्यापैकी ३ लाख ९० हजार लाभार्थ्यांना कार्ड वाटप केले आहे. भारत नेट प्रोजेक्ट अंतर्गत ११ तालुक्यातील १ हजार २८ ग्रामपंचायतींना इंटरनेट सुविधा वापरण्यात आल्या आहेत.



### चिमणी पाडकामात भाजपचा काडीमात्र संबंध नाही

सिद्धेश्वर चिमणी संदर्भात राजकीय नेते मंडळी ही राजकारण करीत आहेत. यात भाजपचा काडीमात्र संबंध नाही. या विषया सदर्भात कोर्टाने आदेश दिल्याने शासनाला हस्तक्षेप करता येत नाही. शासनाला कोर्टाचा निर्णय मान्य करावा लागतो.

### मंद्रूपमध्ये एम.आय.डी.सी काळाची गरज

मंद्रूप एम.आय.डी.सी ही काळाची गरज आहे भविष्यात पुढच्या पिढीला काम मिळवण्यासाठी मंद्रूपच्या शेतकऱ्यांनी जमिनी द्यावे. यासाठी सर्वपक्षीय नेत्यांनी एकत्र येण्याची गरज आहे एम.आय.डी.सी झाल्याशिवाय तालुक्याचा विकास होणार नाही.

## जाधववाडी येथे घरातून सव्वा लाखांचे दागिने गायब

**सोलापूर** : दरवाजा पुढे करून अंगणात झोपले असता चोरट्याने उघड्या घरात प्रवेश करून रोख रकमेसह १ लाख ३० हजार रुपये किमतीचे दागिने पळविले. ही चोरी जाधववाडी (ता.माळशिरस) येथे शुक्रवारी पहाटेच्या सुमारास घडली. यासंदर्भात रानबा नथू करचे (रा. जाधवाडी) यांनी माळशिरस पोलिसात फिर्याद दाखल केली. त्याप्रमाणे पोलिसांनी अनोळखी चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला. चोरट्याने घरात प्रवेश करून त्यांच्या पॅन्टच्या खिशातील ५० हजार रुपये रोख आणि डब्यात ठेवलेले २० ग्रॅम सोन्याचे दागिने पळवले. असे त्यांच्या फिर्यादीत नमूद आहे. हवालदार घोगरे पुढील तपास करीत आहेत.

## तरुणावर खुरपीने वार ; तिघांवर गुन्हा

**सोलापूर** : पत्नीला मारहाण केल्याचा जाब विचारण्यासाठी गेलेल्या तरुणाला गवत कापण्याच्या खुरप्याने मारून जखमी केल्याप्रकरणी तरुणावर गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत अरबाज हैदर दौलताबाद ( वय २५, रा. नारायण नगर, शेळगी) यांच्या फिर्यादीवरून शाहरूख शेख ( वय २०, रा. सुशील अम्मा कोटा नगर ) व त्याच्या दोन साथीदारांवर एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेचा तपास कांबळे करत आहेत. ही घटना २१ जून रोजी घडली.

## सम्राट चौक परिसरात तरुणावर चाकूने वार




**सोलापूर** : सम्राट चौक परिसरात तरूणावर चाकूने वार करून त्याला जखमी केल्याप्रकरणी तिघांवर गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत सुरज चिदानंद शिवशरण ( वय २३, रा. मल्लिकार्जून नगर) यांनी जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. या फिर्यादीवरून शेखर शिवशरण, संतोष शिवशरण, मिलिंद शिवशरण ( सर्व रा. प्रभाकर महाराज मंदिर जवळ) यांच्या गुन्हा दाखल झाला आहे. घटनेचा तपास शेख करत आहेत. ही घटना २१ जून रोजी घडली.

## चार पितळी घागरीसह दूध अज्ञाताने चोरले

**सोलापूर** : बुधवार पेठ परिसरात दूध घालण्यासाठी गेलेल्या औदुसिध्द अप्पाराव बिराजदार ( वय ३०, रा. कुंभारी) यांची १६ हजार रुपये किमतीचे चार पितळी घागरी व दूध अज्ञाताने चोरले. ही घटना १३ जून रोजी घडली होती. याबाबत बिराजदार यांनी फौजदार चावडी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. या फिर्यादीवरून अज्ञात चोरावर गुन्हा दाखल झाला आहे. घटनेचा तपास पोलिस करत आहेत.

## तरुणाने केले विषारी रंग प्राशन

**सोलापूर** : अज्ञात कारणावरून तरूणाने राहत्या घरात सडा मारण्याचा पिवळ्या रंगाचे विषारी रसायन प्राशन केले. अंबादास तिपण्णा मादगुंडी ( वय ३६, रा. निलम नगर) असे छत्रपती शिवाजी महाराज शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आलेल्या इसमाचे नाव आहे. या घटनेची नोंद सिव्हिल पोलिस चौकीत झाली आहे.

## सलगर येथे महिलेचे घर फोडले

**सोलापूर** : सलगर (ता.अक्कलकोट) येथे राहणाऱ्या कलाबाई हनुमंत कोळी यांच्या बंद घराचा दरवाजा उचकटून चोरट्याने २० हजार रुपये रोख आणि १० ग्रॅम सोन्याचे दागिने असा ४० हजाराचा ऐवज पळविला . ही चोरी शुक्रवारी पहाटेच्या सुमारास झाल्याची नोंद अक्कलकोट उत्तर पोलिसात झाली . हवालदार सुरवसे पुढील तपास करीत आहेत.

## चोरट्याने सात रस्ता परिसरातून दुचाकीची पळवली

**सोलापूर** : शहरातील सात रस्ता परिसरातील चहा कॅन्टीन जवळ लावलेली दुचाकी अज्ञात चोराने चोरली. याबाबत संतोष बेलिराम हुलसुरे ( वय ४१, रा. ढोर गल्ली) यांनी सदर बाझार पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. ही घटना १० जून रोजी घडली. या घटनेचा तपास पोसई माळी करत आहेत.

## चोराने वायरच्या बंडलची केली चोरी

**सोलापूर** : पोदार शाळेजवळील फिर्यादीचे काम सूरू असलेल्या घरातून १५ वायरचे बंडल अज्ञात चोराने चोरले. याबाबत महादेव शामराव राऊत ( वय ५१, रा. निर्मल हॉसिंग सोसायटी, आरटी ऑफिस जवळ) यांनी विजापूर नाका पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. या फिर्यादीवरून अज्ञात चोरावर गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेचा तपास गायकवाड करत आहेत. ही घटना २१ जून रोजी घडली.

## अपघातात तरुण जखमी

**सोलापूर** : दुचाकीवरून बारामती ते इंदापूरकडे जात असताना निमगाव जवळ झालेल्या अपघातात तरुण जखमी झाला आहे. सुहास अरूण सुरवसे ( वय २७, रा. माढा) असे जखमी झालेल्या तरुणाचे नाव आहे. त्याला उपचारासाठी छत्रपती शिवाजी महाराज शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या घटनेची नोंद सिव्हिल पोलिस चौकीत झाली आहे.

## सांगोला आठवडा बाजारात चोरट्यांना पोलिसांनी घेतले ताब्यात

सुराज्य/सांगोला

### सव्वातीन लाखांचा मुद्देमाल केला जप्त

येथील आठवडा बाजारातून तीन चोरट्यांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडून चोरी केलेले १३ महागड्या मोबाईलसह एकूण ३ लाख २४ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आल्याची माहिती पोलीस निरीक्षक अनंत कुलकर्णी यांनी दिली आहे.

तालुक्यात आठवडा बाजारातून मोबाईल चोरींच्या घटना वाढल्या होत्या. त्या अनुषंगाने सांगोल्याचे पोलीस निरीक्षक अनंत कुलकर्णी यांनी आठवडा बाजारावर साध्या वेशातील पोलिसांची गस्त वाढवली होती. १८ जून रोजी सांगोला येथील आठवडा बाजारामध्ये गस्त करत असताना एक महिला व दोन व्यक्ती संशयरीत्या आढळल्याने या तिघांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडे चौकशी केली असता त्यांच्याजवळ एकूण १३ महागडे मोबाईल्स व गुन्ह्यात चोरी करता वापरण्यात आलेली मोटरसायकल असे एकूण सुमारे ३ लाख २४ हजार ५०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. बबन धुळा तुपे (वय - ६०), नितीन अर्जुन तुपे (वय - ३०) व शहिदा महादेव तुपे (वय - ३८, सर्व रा. पानवण, ता. माण, जि. सातारा) अशी आहेत. त्यांच्याबाबत अधिक चौकशी केली असता ते रेकॉर्डवरील गुन्हेगार असल्याचेही माहिती अनंत कुलकर्णी यांनी दिली. हा तपास पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, अप्पर पोलीस अधीक्षक हिम्मतराव जाधव, उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रांत गायकवाड, पोलीस निरीक्षक अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हेड कॉन्स्टेबल दत्ता वजाळे, विकास क्षीरसागर, पोलीस नाईक बाबासाहेब पाटील, केदारनाथ भरमशेट्टी, लक्ष्मण वाघमोडे व युसुफ पठाण यांनी केला आहे.

## कत्तलीसाठी आणलेल्या जनावरांना जिवदान

सुराज्य/सोलापूर

कत्तलीसाठी आणलेल्या सहा जनावरांची सुटका करून त्यांना जीवदान देण्यात आले आहे. या प्रकरणी संबंधितांवर फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कत्तल करण्यासाठी सहा जनावरे खरेदी करून आपल्या घराजवळ न बांधता एका गवळींच्या वाड्यात बांधण्यात आले होते. अन्य ३ जनावरे महानगरपालिकेच्या गाळ्यात बांधून ठेवण्यात आले होते. बांधण्यात आलेली जनावरे ही कत्तल करण्यासाठी आणण्यात आल्याची माहिती अखिल भारत कृषी गोसेवा संघाचे जिल्हाध्यक्ष सुधीर बहिरवाडे यांना समजली. त्यांनी पाणीवेस तालीम येतील धर्म रक्षक व पोलीस प्रशासनाला सोबत घेऊन गवळ्याच्या घरी गेले. गवळ्याला वाड्यातील तीन जनावरांबाबत विचारणा केली, तेव्हां त्याने एका व्यापाऱ्याने मला पैसे देऊन बकरी ईद पर्यंत सांभळण्यास सांगितल्याची माहिती दिली. या प्रकरणी जनावरे ठेवून घेणारा गवळी व संबंधित व्यापारी या दोघांविरूद्ध फौजदारी चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. ही कामगिरी यशस्वी करण्यासाठी अखिल भारतीय सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष सुधीर बहिरवाडे, पंकज काटकर, केतन अंजिखाने, अभिजीत जाधव, ओंकार पवार, दिग्विजय नवगीरे, अभिजीत स्वामी, लखन अंजिखाने यांचे सहकार्य लाभले.

## सोलापूर-तिरुपती, सोलापूर-पुणे दरम्यान धावणाऱ्या गाड्यांना मुदतवाढ

सुराज्य/सोलापूर



सोलापूर रेल्वे विभागातून धावणाऱ्या सोलापूर-लोकमान्य तिलक टर्मिनस-सोलापूर, सोलापूर-तिरूपती-सोलापूर तसेच पुणे-सोलापूर-दौंड दरम्यान धावणाऱ्या विविध गाड्यांना प्रशासनाने तीस दिवसांची मुदतवाढ दिली आहे. प्रवाशांकडून वाढता प्रतिसाद मिळत असून यामुळे या गाड्यांना मुदतवाढ देण्यात आल्याची माहिती रेल्वे प्रशासनाने दिली आहे.

सोलापूर-लोकमान्य टिळक टर्मिनस साप्ताहिक विशेष गाडी (क्रमांक ०१४३५) ही ४ जुलै पर्यंत धावणार होती. आता ही गाडी २६ जुलै पर्यंत धावणार आहे. सोलापूर-लोकमान्य टिळक टर्मिनस (क्रमांक ०१४३६) ही गाडी २८ जून पर्यंत धावणार होती. आता ही गाडी २६ जुलै पर्यंत धावणार आहे. सोलापूर-तिरुपती ही साप्ताहिक गाडी (क्रमांक ०१४३७) ही २९ जून पर्यंत धावणार होती.

आता ही गाडी २७ जुलै पर्यंत धावणार आहे. तिरूपती-सोलापूर ही गाडी ३० जून पर्यंत धावणार होती. आता ही गाडी २८ जुलै पर्यंत धावणार आहे.

## पिलीव नगरी वारकऱ्यांच्या स्वागतासाठी सज्ज

**पिलीव** : माळशिरस तालुक्यातील पिलीव गावातुन आषाढी वारीनिमीत्त पंढरपूरला २३ ते २५ जूनच्या दरम्यान ३० च्या आसपास पालखया जातात. जवळपास सर्वच पालख्यांचा पिलीव परीसरात वेगवेगळ्या ठिकाणी मुक्काम असतो.वारकऱ्यांच्या स्वागतासाठी सध्या पिलीव नगरी सज्ज झाली आहे. यामध्ये महाविरतण मार्फत २४ तास अखंडीत विजपुरवठा, प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वतीने आरोग्य सुविधा पुरविणे, ग्रामपंचायतीच्या वतीने पिणयाचे पाणी पुरविणे, रस्त्यावरील खडडे बुजविले आहेत. जंतुनाशकाची फवारणी करणयात आली आहे. माळशिरस पोलीस स्टेशनचे पोलिस निरीक्षक राजेंद्र टाकणे यांच्या मार्गदशनाखाली पोलीस उपनिरीक्षक पुजारी ,हवालदार अभिजीत कणसे,पंडीत मिसाळ,राहुल वाघ,सतिश धुमाळ, दत्तात्रय खरात, अमीत जाधव यांनी चोख पोलीस बंदोबस्त ठेवला आहे



## मुंढेवाडी येथे ९ नऊ लाखांची विदेशी दारू जप्त

सुराज्य/सोलापूर

राज्य उत्पादन शुल्कच्या पथकाने आज शनिवारी मुंढेवाडी (ता. अक्कलकोट) येथे शेतातील पत्र्याच्या शेडमधून गोवा राज्य निर्मित ८ लाख ७९ हजार किंमतीचा विदेशी दारुचा साठा जप्त केला आहे.

मुंढेवाडी (ता. अक्कलकोट) गावाच्या हद्दीत मुंढेवाडी-केगाव रोडवरील शिरगुरे वस्ती याठिकाणी एका शेतात बनविलेल्या पत्र्याच्या शेडमध्ये छापा टाकला असता त्या ठिकाणाहून गोवा राज्य निर्मित व महाराष्ट्र राज्यात विक्रिस प्रतिबंध असलेला विदेशी मद्याच्या १२४ पेट्या जप्त करण्यात आल्या. घटनास्थळी कोणीही इसम मिळून न आल्याने गुन्ह्यातील संशयित आरोपींचा शोध घेण्याचे काम दुय्यम निरिक्षक शिवकुमार कांबळे करीत आहेत. अधीक्षक नितीन धार्मिक यांच्या मार्गदर्शनाखाली निरिक्षक सुनिल कदम, दुय्यम निरिक्षक सुरेश झगडे, शिवकुमार कांबळे, सहायक दुय्यम निरीक्षक मुकेश चव्हाण, जवान अशोक माळी, अण्णा कर्चे, योगीराज तोग्गी आदींनी केली .

## स्वेरीच्या ५४ विद्यार्थ्यांची जय हिंद इंडस्ट्रीज कंपनीत निवड

सुराज्य/पंढरपूर

फोर्स मोटर्स ग्रुपसच्या जय हिंद इंडस्ट्रीज प्रायव्हेट लिमिटेड' या बहुराष्ट्रीय दर्जाच्या कंपनीने घेतलेल्या मुलाखतीतून गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील श्री.विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयूट संचलित अभियांत्रिकी (डिप्लोमा) महाविद्यालयातील तब्बल ५४ विद्यार्थ्यांची कॅम्पस इंटरव्युवद्वारे निवड करण्यात आली आहे.' अशी माहिती संस्थेचे संस्थापक सचिव डॉ.बी.पी. रोंगे यांनी दिली.

स्वेरीच्या पदवी अभियांत्रिकी कॉलेज प्रमाणेच डिप्लोमा कॉलेज देखील प्लेसमेंट मध्ये आकाशाला गवसणी घालत आहे. पुणे येथील फोर्स मोटर्स ग्रुपच्या 'जयहिंद इंडस्ट्रीज प्रायव्हेट लिमिटेड.' या नामांकित कंपनीच्या निवड समितीने गोपाळपूर येथील डिप्लोमा इंजिनिअरिंग कॉलेज मधील विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेतल्या. कंपनीच्या अधिकाऱ्यांनी या निवड प्रक्रियेच्या अंतिम फेरीतून डिप्लोमाच्या इलेक्ट्रीकल इंजिनिअरिंग विभागात अंतिम वर्षात शिक्षण घेणारे आनंद उत्तम सपकाळ, स्वप्नील श्रीहरी माळी, रोहित भिमराव काळे, प्रतीक भगवान सागर, अनिकेत राजेंद्र शिरसट, संग्राम आनंदराव जगदाळे, समाधान नागनाथ खांडेकर, समर्थ पांडुरंग चव्हाण, अर्जुन चिमा नायकु व सिद्राम चंद्रकांत बिराजदार या १० विद्यार्थ्यांची तर डिप्लोमाच्या मेकॅनिकल इंजिनिअरिंगच्या अंतिम वर्षातील महेश आप्पासो बुरंगळे, प्रणव सुभाष बागल, माऊली संजय गोरे, शुभम राजेंद्र रोंगे, विश्वजीत संतोष शेळके, अक्षय नागेश लोकरे, आतिक इम्तियाज मणियार, सुरज मोहन उबाळे, यश संतोष कोकाटे, अनिकेत कैलास काटकर, रोहन रावसाहेब कोडग, अविनाश राजकुमार माने, शंतनु विठ्ठल माने, प्रशांत धर्मराज घोडके, अक्षय करण नारायणकर, अक्षय वसंत देवकर, प्रथमेश राजेंद्र खोटे, हर्षद रवींद्र खुर्द, प्रथमेश श्रीकांत लव्हेकर, ओंकार नागनाथ आगळे, प्रतीक दीपक एडवे, संदेश दत्तात्रय शिंदे, सौरभ सुधीर कुलकर्णी, सुरज जमीर तांबोळी, अनिरुद्ध शरद बुरगुटे, प्रणव गोरख घाडगे, ओंकार रणजीत पवार, अमर दत्तात्रय बाबर, अथर्व मिलिंद बोचरे, रोहन शहाजी चवरे, शुभम बाजीराव गायकवाड, अक्षय धुळा कोळेकर, मयूर नवनाथ सुरवसे, आदित्य हरिश्चंद्र शेळके, प्रमोद विठ्ठल कडलासकर, सत्यम नितीन चव्हाण, संग्राम महादेव रणदिवे, विघ्नेश अरविंद सुरवसे, सार्थक संदीप जोशी, निखिल सुनील सरवदे, हर्षवर्धन दुशांत कुलकर्णी, सत्यजित साहेबराव कदम, विपुल हनुमंत ढाणे व ओंकार चंदू जाडकर हे ४४ विद्यार्थी असे मिळून एकूण ५४ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली.

## अक्कलकोटमध्ये गुरूपौर्णिमा महोत्सवाचा शुभारंभ

सुराज्य/अक्कलकोट



श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्या ३६ वा वर्धापनदिन व गुरूपौर्णिमा महोत्सवाचा शानदार शुभारंभ न्यासाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली शुक्रवार दि. २३ जून रोजी सायंकाळी ६.३० वाजता श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळातील प्रांगणात वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानाचे पुरोहित मंदार पुजारी, श्री स्वामी समर्थ समाधी मठाचे पुजारी वे.शा.सं. श्री अण्णू महाराज, श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे अध्यक्ष महेश इंगळे, तहसिलदार बाळासाहेब सिरसट, नूतन उपविभागीय पोलीस अधिकारी विलासराव यामावार, अक्कलकोट नगर परिषदेचे मुख्याधिकारी सचिन पाटील आदी मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करुन पहिल्या पुष्पाचे उद्घाटन करण्यात आले.

थोर संगित दिग्दर्शक व गायक पद्मश्री पंडीतजी हृदयनाथ मंगेशकर यांच्या मार्गदर्शनाखाली राधा मंगेशकर आणि सहकारी मुंबई यांचा नक्षत्रांचे देणे, कार्यक्रम सादर करण्यात आला. यांच्या समवेत डॉ. राजेंद्र दुरकर, विशाल गुंडतवार, ऋतुराज कोरे, शैलेश देशपांडे, विवेक परांजपे, यश भंडारे, मनीषा निचळ, केतन गोडबोले, सोनाली श्रीखंडे, शिरीष रामरीकर यांनी साथ दिली.

समाजसेवक सुरेश सूर्यवंशी व उद्योजक स्वामिनाथ हिप्परगी, प्रसिध्द व्यापारी प्रकाश किलजे, उत्कृष्ठ स्थापत्य अभियंता सोमनाथ लंगोटे यांचा न्यासाच्या वतीने गुणीजन गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

उद्घाटन सोहळ्यास उपस्थित मान्यवरांचा सत्कार अन्नछत्र मंडळाचे प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले, उपाध्यक्ष अभय खोबरे, सचिव शामराव मोरे, विश्वस्त भाऊ कापसे यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा कृपावस्त्र देऊन करण्यात आला. न्यासाचे मुख्य पुरोहित अप्पू पुजारी यांच्या हस्ते यथसांग मंत्र पठणाने श्री स्वामी समर्थांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

यावेळी न्यासाचे विश्वस्त अलकाताई भोसले, अर्पिताराजे भोसले, माजी नगराध्यक्षा अनिता खोबरे, अक्षता खोबरे, कोमल खोबरे, जयश्री मगर, स्वाती निकम, स्मिता कदम, पल्लवी नवले, कविता वाकडे, क्रांती वाकडे, संगीता भोसले, अंजना पवार, उज्वला भोसले, कोमल मचाले, संपदा श्रीमान व न्यासाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, भाऊ कापसे, मनोज निकम, विश्वस्त संतोष भोसले, राजेंद्र लिंबीतोटे, कर्मचारी, भक्तगण, श्रोते बहुसंख्येने उपस्थित होते. प्रास्ताविक व सूत्रसंचलन श्वेता हुल्ले यांनी केले. तर न्यासाचे सचिव शामराव मोरे यांनी आभार मानले.

## भरडधान्य बियाणांचा शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा

### कृषि अधिकारी गावसाने यांचे आवाहन

सुराज्य/सोलापूर

संयुक्त राष्ट्रसंघाने २०२३ हे वर्ष आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष म्हणून घोषित केले आहे. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात शेत तिथे पौष्टिक तृणधान्य मोहिमेंतर्गत पौष्टिक तृणधान्य पिकांचे क्षेत्र व उत्पादन वाढीच्या अनुषंगाने जिल्ह्यातील शेतकऱ्यांना सुधारित बियाण्याचे मिनीकिट आधारित बियाणे उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. या मिनीकिट भरडधान्य बियाणांचा अधिकाधिक शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी दत्तात्रय गावसाने यांनी पत्रकाद्वारे केले आहे.

पौष्टिक तृणधान्य वर्ष या संकल्पने अंतर्गत ज्वारी, बाजरी, नाचणी, कोडो, राळा, राजगिरा इत्यादी पौष्टिक तृणधान्य पिकांच्या उत्पादन वाढीबरोबरच या पिकांच्या आरोग्यविषयक फायद्याबाबत जनजागृती करून लोकांच्या आहारातील पौष्टिक तृणधान्यांचे प्रमाण वाढविणे तसेच तृणधान्य पिकवणाऱ्या शेतकऱ्यांच्या उत्पादनात वाढ करणे हा प्रमुख हेतू आहे. सोलापूर जिल्ह्याने पुढाकार घेत शेत तिथे पौष्टिक तृणधान्य मोहिमेंतर्गत पौष्टिक तृणधान्य पिकांचे क्षेत्र व उत्पादन वाढीच्या अनुषंगाने शितकऱ्यांना सुधारित बियाण्याचे मिनीकिट आधारित बियाणे उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

कृषि विभागाने ज्वारी, बाजरी, नाचणी, राळा, कोदो व राजगिरा या भरडधान्यांचे मिनीकिट बियाणे महाबीज, सोलापूर व राष्ट्रीय बीज निगम पुणे यांच्याकडून भरडधान्यांचे एकूण ३५१५० मिनीकिटस् मागवण्यात आले आहे. भरडधान्य बियाणांचा जिल्ह्यातील अधिकाधिक शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन गावसाने यांनी केले आहे.

# भाजपने हुकूमशाहीचे राज्य आणले आहे

## काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांची टीका

✔ सुराज्य/अक्कलकोट

**देशातील आणि राज्यातील भाजपचे सरकार हे शांतता बिघडवण्याचे काम करत आहे. आज स्टेटसच्या कारणावरून राज्यात अनेक ठिकाणी दंगली होत आहेत, मारामारी होत आहेत कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे अशोभनीय आहे. निवडणूक आली की वाद-विवाद निर्माण करून मत मिळवायची आणि खोटे आश्वासन देऊन सत्ता मिळवायची हा भाजपचा धंदा झाला आहे. मागच्या नऊ वर्षांच्या काळात भाजप सरकारने संविधानाचे तीन तेरा करण्याचे पाप केले आहे हे जनता कधीही विसरणार नाही. हुकूमशाहीचे राज्य आणले आहे, अशी घणाघाती टीका काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केली.**



शुक्रवारी, पटोले हे स्वामी समर्थांच्या दर्शनासाठी अक्कलकोट दौऱ्यावर आले होते. यानंतर काँग्रेस कार्यालयाला सदिच्छा भेट देत कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. प्रारंभी सोलापूर रोडवरील हॉटेल प्रेसिडेंटजवळ शेकडो कार्यकर्त्यांनी माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांच्या नेतृत्वाखाली प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांचे स्वागत केले. यावेळी पटोले म्हणाले, 'सर्वसामान्य जनता यांच्या कामकाजाला वैतागली आहे. महागाई प्रचंड वाढलेली आहे. बेरोजगारी प्रचंड वाढलेली आहे. केवळ 'अच्छे दिन' आणण्याचे स्वप्न दाखवून जनतेची घोर फसवणूक झालेली आहे. नेहमी काँग्रेसने देशासाठी काय केले असा प्रश्न विचारला जातो. सुईपासून ते रॅकेटपर्यंतची प्रगती ही काँग्रेसने केली आहे. कार्यकर्त्यांनी मनामधील न्यूनगंड कमी करावा आणि एकजुटीने लढून भाजपला नेस्तनाबूत करावे तरच देशाचे संविधान वाचू शकते.

'काँग्रेस हा शेतकऱ्यांचा पक्ष आहे तर भाजप इव्हेंट करणारा पक्ष आहे. यांना शेतकऱ्यांचे काही देणे घेणे नाही. आज राज्यात शेतकऱ्यांच्या हजारो आत्महत्या झालेल्या आहेत. पावसाचा पत्ता नाही खरीप हंगाम वाया जाण्याची वेळ आलेली आहे. यात शेतकऱ्यांना दमडीची मदत नाही. सरकार शेतकऱ्यांविषयी खूप काही करत असल्याचे केवळ भासविते पण प्रत्यक्षात काहीही नाही, असेही पटोले म्हणाले.'

प्रारंभी काँग्रेस कार्यालयानंतर अक्कलकोट काँग्रेस कमिटीच्यावतीने काँग्रेसचे जिल्हा कार्याध्यक्ष अशपाक बळोरगी व शहराध्यक्ष रईस टिनवाला यांनी पटोले व अन्य मान्यवरांचे स्वागत करून सत्कार केला.

यावेळी एबी ग्रुपचे अतिक बागवान, अजीम अत्तार यांनी आपल्या असंख्य कार्यकर्ते काँग्रेस पक्षात प्रवेश केला. यावेळी माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे, जिल्हाध्यक्ष डॉ. धवलसिंह मोहिते -पाटील, तालुकाध्यक्ष शंकर म्हेत्रे, बाजार समितीचे माजी सभापती प्रथमेश म्हेत्रे, काँग्रेसच्या महिला तालुकाध्यक्ष शितल म्हेत्रे, माजी आमदार विश्वनाथ चाकोते,विजयकुमार हत्तुरे, पंडित सातपुते, अभिराज शिंदे,लाला राठोड, सिद्धार्थ गायकवाड, मुबारक कोरबू, मेनोद्दीन कोरबू, शिवराज स्वामी, सरफराज शेख, शबाब शेख, अलिबाशा अत्तार, सद्दाम शेरीकर, रोहिदास राठोड, विश्वनाथ हडलगी आदींसह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. या दौऱ्यात त्यांनी कार्यकर्त्यांसमवेत अक्कलकोट वटवृक्ष देवस्थान, श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाला भेट दिली तसेच ग्रामदैवत हजरत पीर ख्वाजा दाऊद दर्ग्याला भेट देऊन दर्शन घेतले आणि शुभेच्छा दिल्या.

### अक्कलकोटची जागा जिंकण्याचा निर्धार करा

'राज्यातील सरकार घालवण्यासाठी मी अक्कलकोटला आलोय. केंद्रात व राज्यात जुलमी सरकार आलेले आहे. सत्ता उलथविण्यासाठी श्री स्वामी समर्थांना साकडे घातले आहे. राज्यात भाजपचे सरकार जाऊन आगामी काळात काँग्रेसच्या नेतृत्वाखालील सरकार येणार ही काळ्या दगडावरची पांढरी रेघ आहे. त्यामुळे अक्कलकोटची जागा काँग्रेसला जिंकून आणण्याचा निर्धार कार्यकर्त्यांनी करावा', असे आवाहन पटोले यांनी केले.

### भाजपने देश विकायला काढला

काँग्रेसशिवाय देशाला पर्याय नाही. मागच्या साठ वर्षात काँग्रेसने देशाला उभे करण्याचे काम केले आहे तर भाजपने मागच्या नऊ वर्षात देशाला कर्जबाजारी केले आहे आणि मूठभर लोकांच्या स्वार्थासाठी देश विकायला काढला आहे. त्यांना त्यांची जागा दाखवल्याशिवाय पर्याय नाही, असे पटोले म्हणाले.



## ऑर्किड महाविद्यालयात योगाचे प्रात्यक्षिक

✔ **सोलापूर :** तळे हिप्परगा येथील एन. के. ऑर्किड अभियांत्रिकी महाविद्यायात धनंजय सुर्यवंशी आणि जयेंद्र भालेराव यांनी विविध प्रकारच्या योग साधण्याचे प्रकार सादर केले. यावेळी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. बी. के. सोनगे यांनी योग साधनेचे महत्त्व सांगितले. योग साधनेने आपण ताण तणाव, भिती आणि इतर शारीरिक व्याधींपासून कसे दूर राहू शकतो, याबद्दलची माहिती धनंजय सुर्यवंशी यांनी दिली. या योगशिबिरात विविध प्रकारचे आसने आणि सूक्ष्म व्यायामाचे प्रात्यक्षिक घेण्यात आले. याप्रसंगी सर्व विभागाचे विभागप्रमुखांसह पॉलिटेक नॅन्सी फ्रान्सचे तीन विद्यार्थी, शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.

## कल्पना अक्कलकोटे यांचे वीरशैव परीक्षेत यश

✔ **बार्शी :** श्री काशी जगदगुरु विश्वाराध्य वीरशैव विद्यापीठ वाराणसीच्यावतीने घेण्यात आलेल्या वीरशैव पंडित परीक्षेत बार्शीच्या कल्पना नागेश अक्कलकोटे या सोलापूर जिल्ह्यात दुसऱ्या क्रमांकाने उत्तीर्ण झाल्या आहेत.



वीरशैव विद्यापीठ (काशी) वाराणसीच्यावतीने २०२२-२३ या शैक्षणिक वर्षात घेण्यात आलेल्या वीरशैव पंडित परीक्षेत येथील महाराष्ट्र विद्यालयात शिक्षिका म्हणून कार्यरत असलेल्या अक्कलकोटे यांनी श्री गुरु मणीकंठ शिवाचार्य दहीवडकर महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली हा अभ्यासक्रम पूर्ण केला. या परीक्षेचा निकाल नुकताच घोषित झाला असून ७० टक्के गुण घेऊन अक्कलकोटे सोलापूर जिल्ह्यात द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण झाल्या आहेत. अक्कलकोटे यांचे या यशाबद्दल काशी जगदगुरु तसेच बार्शीतील सर्व शिवाचार्य, माजी मंत्री दिलीप सोपल, श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे डॉ. बी. बाय. यादव, पी. टी. पाटील, नंदन जगदाळे, विष्णु पाटील, जयकुमार शितोळे यांनी अभिनंदन केले आहे.

## शिवसेना महिला आघाडीच्या जिल्हा संघटकपदी प्रिया बसवंती

✔ **सोलापूर :** ठाकरे गटाच्या शिवसेना महिला आघाडीच्या जिल्हा संघटकपदी प्रियाताई आप्पासाहेब बसवंती यांची नियुक्ती करण्यात आली आहे.



त्यांच्यावर अक्कलकोट व दक्षिण सोलापूर या दोन विधानसभा मतदारसंघाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. प्रियाताई ह्या गेल्या पाच वर्षांपासून शिवसेनेत सक्रिय आहेत. त्यांनी सोलापूर शहर उत्तर विधानसभा मतदारसंघात उपजिल्हाप्रमुख म्हणून उल्लेखनीय कार्य केल्यामुळे त्यांना बढती देण्यात आली आहे. विशेष म्हणजे त्या गेल्या वीस वर्षांपासून सामाजिक कार्यात असून वीरशैव महिला आघाडीत त्यांनी खजिनदार म्हणून काम केले आहे. महिलांना रोजगार उपलब्ध करुन देण्यावर त्यांचा भर आहे. त्यांनी अनेक आरोग्य शिबिरे घेतली आहेत. महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी त्यांनी राजलक्ष्मी संस्थेची स्थापना केली आहे व बचत गटाच्या माध्यमातून महिलांना गृहोद्योग मिळवून दिले आहे. आगामी निवडणुकीच्या निमित्ताने शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे महिला आघाडीच्या शाखा स्थापन करुन पक्ष अधिक मजबूत करण्यासाठी व विविध कार्यक्रम घेऊन शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे विचार तळागाळात पोहोचविण्याचा त्यांचा मनोदय आहे.

## गजानन महाराजांच्या पालखीमधील वारकऱ्यांना आस्थाकडून किट वाटप

✔ **सोलापूर :** दिपकभाऊ निकाळजे सामाजिक विकास संघटना आणि आस्था रोटी बँकेच्या माध्यमातून गेल्या १० वर्षांपासून पंढरपूरसाठी पायी जाणाऱ्या शेगावचे गजानन महाराजांची पालखी सोलापुरात आगमन होत असते. तरी आमच्या संस्थेच्या माध्यमातून गजानन महाराज पालखी प्रभाकर महाराज ते कुचन प्रशालेमार्गे जात असताना मंगळवार पेठ, भुसार गल्ली येथे वारकऱ्यांना जीवनावश्यक साहित्य किट वाटप करून सामाजिक बांधिलकी जोपासली आहे. समाजाचे आपण काहीतरी देणं लागतो या उद्देशाने सामाजिक कार्य करत आहे.

साहित्य किटमध्ये अंगाला लावयचे साबण, कपड्याला लावायचे साबण, तेल बॉटल, झेंडू बाम, टुथपेस्ट असा साहित्य किट दरवर्षी वाटप करण्यात येतो. दरम्यान यावेळी श्री संत गजानन महाराज महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार हार घालून पूजन करून वारकरी यांना किट वाटप करण्यात आले. यावेळी दिपकभाऊ निकाळजे सामाजिक संघटनेचे शहराध्यक्ष आनंद तालिकोटी, शिवानंद सावळगी, बसवराज बेऊर, वरद जट्टे, पिंटू कस्तुरे, वेदांत तालिकोटी, आनंद कपाळे, रोहित शर्मा, कुणाल कुगुलवार, शरण लिगाडे, सुरज छंचुरे, महेश रवी आदी पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## सुनेस आत्महत्येस प्रवृत्त; तिघांवर गुन्हा दाखल

✔ **मोहोळ :** लग्नात मानपान व्यवस्थित केला नाही म्हणत शारीरिक व मानसिक त्रास देवून आत्महत्येस प्रवृत्त केल्याबद्दल आष्टे (ता. मोहोळ) येथील नवऱ्यासह सासू, सासरे अशा तिघांवर मोहोळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. ज्ञानेश्वरी हिचे आष्टे येथील भालचंद्र सुरेश गावडे यांच्याशी २०१९ मध्ये लग्न झाले. तिला अडीच वर्षाची मुलगीही आहे.




लग्नामध्ये दीड लाख रु. रोख व तीन तोळे सोनेही दिले होते. लग्नानंतर नवरा, सासू, सासरे यांनी एक महिना व्यवस्थित सांभाळले. त्यानंतर तुझ्या आई वडिलांनी ठरलेला मान पान निट केला नाही, असे म्हणत त्रास देऊ लागले. हुंड्यांतील राहिलेले ५० हजार रुपये व दोन तोळे सोने घेऊन ये, असे म्हणून त्रास देऊ लागले होते. वारंवार त्यांची भाडणे होत होती. रोजच्या होणाऱ्या त्रासाला कंटाळून तिने १८ जून रोजी गळफास घेऊन आत्महत्या केली. आत्महत्येस प्रवृत्त केल्याने नवरा भालचंद्र गावडे, सासू पद्मिनी सुरेश गावडे व सासरा सुरेश गैबी गावडे या तिघांवर मोहोळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## लोकविकास शिक्षण संस्थेत दिंडी सोहळ्याचे आयोजन

✔ सुराज्य/वेळापूर

लोकविकास इंग्लिश मीडियम व लोकविकास मराठी मीडियम यांच्यावतीने दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी लक्ष्मण चव्हाण, ह.भ.प अजित साठे, लोकविकास ज्युनिअर कॉलेजचे मुख्याध्यापक अमोल पांढरे, लोकविकास इंग्लिश मीडियम स्कूलचे मुख्याध्यापक अजित बनकर व मराठी मीडियम स्कूलचे मुख्याध्यापक सुनील पताळे यांच्या हस्ते पालखीचे पूजन करून दिंडी सोहळ्याला सुरुवात करण्यात आली.

यावेळी विद्यार्थ्यांनी विविध प्रकारच्या वेशभूषा सादर केल्या. शाळेच्या मैदानावर रिंगण देखील आयोजन करण्यात आले होते. मुलांच्या हातात भगवे झेंडे तर मुलींच्या डोक्यावर तुळशी वृंदावन, 'विठ्ठल नामाची शाळा भरली, शाळा शिकताना तहान भूक हरली'



या अभंगाप्रमाणे विठ्ठल रखुमाईच्या भक्तीत दंग झालेले बालवारकरी लोकविकास शिक्षण संस्थेमध्ये अवतरले. यावेळी ज्ञानाच्या मंदिरात भोळ्या विठ्ठलाच्या हरिनामाचा गजर झाला अन् अवघी शाळा दिंडी सोहळ्याच्या भक्तिरसात तल्लीन झाल्याचे पाहायला मिळाले.

लेखनी साठे, रसिक साठे, तृप्ती जाधव, आदिती जाधव यांनी अभंग गायले. यावेळी राया वाघमारे, अमोल साठे, सिनाप्पा शेंडगे, वैभव जगताप, ऋषिकेश राऊत, महेश काळे, विजया चापले, अश्विनी शिंदे, अरुणा बनसोडे, विद्या स्वामी, विद्या येवारे, कविता बनकर, राणी शिंदे, वैशाली आदलिंगे, प्रियंका अंनतकवळस, ऐश्वर्या राऊत, उषा राऊत आदी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## कुक्कुट पालन प्रशिक्षणासाठी १ जुलैपर्यंत नावनोंदणी करावी

**जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. नरळे यांची माहिती**

✔ सुराज्य/सोलापूर

जिल्हा परिषदेच्या पशुसंवर्धन विभागामार्फत पंधरा दिवसाचे कुक्कुटपालन प्रशिक्षण देण्यात येणार आहे. यासाठी पशुपालक शेतकरी व सुशिक्षित बेरोजगारांनी प्रशिक्षणासाठी नावनोंदणी करावी, असे आवाहन जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद डॉ. एन. एल. नरळे यांनी पत्रकाद्वारे केले आहे.

हे कुक्कुट पालन प्रशिक्षण दि. ५ ते २० जुलै २०२३ या कालावधीत आयोजित केलेले आहे. प्रवेश इच्छुकांनी दि. १ जुलै २०२३ पर्यंत सधन कुक्कुट



विकास गट नेहरूनगर, सोलापूर येथे नाव नोंदणी करावी.

प्रशिक्षणासाठी शैक्षणिक अर्हता किमान ७ वी पास आवश्यक आहे. हे प्रशिक्षण सुशिक्षित बेरोजगारांना सुवर्णसंधी असून त्याचा उपयोग करून घेण्यात यावा, असे आवाहन डॉ. एन. एल. नरळे यांनी केले आहे.

या प्रशिक्षणास प्रवेश घेण्याकरिता विहित नमुन्यातील अर्ज, शाळा सोडल्याचा दाखला, जातीचा दाखला, आधार कार्ड इत्यादी कागदपत्रे तसेच शासकिय सेवा शुल्क खुल्या प्रवर्गास २०० रुपये व मागासवर्गीयासाठी १०० रुपये प्रवेश शुल्क आहे.

## खाली पडून महिला वारकरी जखमी

✔ **सुराज्य/सोलापूर :** आषाढी वारीत जाण्यासाठी निघालेली एक महिला वारकरी ट्रकमधून खाली उतरताना खाली पडून जखमी झाल्याची घटना फलटण तालुक्यातील भरड गावात गुरुवारी सकाळी घडली. वत्सला श्रीराम साबळे ( वय ६०, रा. गोभनी, ता. रिसोड, वाशिम) असे त्या जखमी महिला वारकऱ्याचे नाव आहे. त्यांना नातेपुते येथील सरकारी दवाखान्यात प्रथमोपचार करून रेफरने छत्रपती शिवाजी महाराज शासकिय रुग्णालयात दाखल केले. या घटनेची नोंद सिव्हिल पोलीस चौकीत झाली आहे.

## तीन वर्षापूर्वी लावलेली झाडे रंगीबेरंगी विद्युत माळांनी सजवून साजरा झाला जाणीव फाऊंडेशनचा वर्धापन

✔ सुराज्य/बार्शी

सामाजिक उत्तरदायित्व व पर्यावरण संवर्धनाचे ध्येय ठेवून स्थापन झालेल्या जाणीव फाऊंडेशनचा तिसरा वर्धापनदिन फाऊंडेशनच्या पदाधिकारी व सदस्य यांनी तीन वर्षांपूर्वी शहराच्या विविध भागात लावलेल्या वृक्षांना रंगीबेरंगी विद्युत माळांनी सजवून व केक कापून साजरा केला. बाजार समितीचे सभापती रणवीर राऊत यांच्या हस्ते भगवान शिवशंकराची आरती करून प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते झाडाचा तिसऱ्या वाढदिवसानिमित्त केक कापण्यात आला. यावेळी 'हरघर गाय अभियान' अंतर्गत ज्यांनी जाणीव गोशाळाला गाई दिल्या व बार्शी तालुक्यातील शेतकऱ्यांनी जाणीव



गोशाळेतील गाई सांभाळ करण्यासाठी नेल्या, अशा गोपालकांचा व गोशाळेसाठी नेहमी मदत करणाऱ्या व्यापाऱ्यांचा जाणीव फाऊंडेशनकडून प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

यावेळी पोलीस निरीक्षक संतोष गिरीगोसावी, उद्योगपती दिलीप गांधी, माजी नगरसेवक विलास रेणके, प्रशांत कथले, समीर वायकुळे, अशोक गायकवाड, युवा उद्योजक कमलाकर जवारे उपस्थित होते. यावेळी सभापती रणवीर राऊत यांनी जाणीव गोशाळेसाठी मदत करण्याचे आश्वासन दिले तर विलास रेणके यांनी जाणीव गो शाळेच्या निवाराशेडसाठी ५ हजार रुपये देणगी दिली.

यावेळी पोलीस निरीक्षक गिरीगोसावी व सचिन वायकुळे यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाला बार्शीतील विविध सामाजिक संघटनेचे पदाधिकारी व बार्शीतील गोरक्षक धन्यकुमार पाटवा, सुमित नवले, अजय भानवसे, मिताली गरड व जाणीव फाऊंडेशनचे सर्व पदाधिकारी, वृक्षप्रेमी, गोरक्षक उपस्थित होते. प्रास्ताविक वसंत हवालदार यांनी केले व आभार तुळशीदास मस्के यांनी मानले तर सूत्रसंचालन संतोष पवार यांनी केले.

## पत्नीचा छळ केल्याप्रकरणी पतीसह दहा जणांवर गुन्हा

✔ सुराज्य/सोलापूर

महागडे संसारोपयोगी साहित्य व फर्निचरसाठी पत्नीचा छळ केल्याप्रकरणी पतीसह दहा जणांवर विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत शगुफ्ता मोहसिन शेख (वय २८, रा. आंबेडकर नगर, होटगी रोड) यांनी फिर्याद दिली आहे.

शगुफ्ता यांचे मोहसिन अब्दुल मोईन शेख याच्याशी २०२२ मध्ये विवाह झाला. विवाहानंतर त्यांच्या कुटुंबियांनी शगुफ्ता यांना मानसिक व शारीरिक त्रास देत होते. शिवाय आई वडिलांकडून १० लाख रूपये घेऊन ये नाहीतर महागडे संसारोपयोगी साहित्य घेऊन ये म्हणत त्रास देत होते. शिवाय जीवे ठार मारण्याची धमकी देत उपाशी पोटी ठेवत होते, अशा आशयाची फिर्याद शगुफ्ता शेख यांनी दिली आहे.

या फिर्यादीवरून मोहसिन अब्दुल मोईन शेख, सासू आतेफा शेख, सासरे अब्दुल मोईन शेख (रा. गणेश नगर, परभणी), निकत कौसर तकीअहमद शेख, तकी अहमद शेख (दोघे रा. नांदेड), नुसरत कौसर इम्तियाज शेख, ईशरत कोसर इमराज सय्यद, मसर्रत कौसर सरफराज शेख, सरफराज अकबर शेख (रा. चंद्रकला नगर, नई जिंदगी), तलक कौसर अब्दुल मोईन शेख (रा. जालना) यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे.

या घटनेचा तपास बिराजदार हे करीत आहेत.

## सर्वसामान्य नागरिकांना माफक दरात वाळू मिळणार : पालकमंत्री

### जांबुड येथे शासकीय वाळू केंद्राचे उद्घाटन

✔ सुराज्य/श्रीपूर

जांबुड (ता. माळशिरस) महाराष्ट्र शासनाने सर्वसामान्य नागरिकांना माफक दरात वाळू उपलब्ध करून देण्याकरिता वाळूचे उत्खनन साठवून व ऑनलाईन प्रणालीव्दारे विक्री करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे आता सर्वसामान्य नागरिकांना माफक दरात वाळू मिळणार आहे, असे प्रतिपादन पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी केले. ते जांबुड येथे शासकिय वाळू विक्री केंद्राचे उद्घाटनप्रसंगी बोलत होते.

विखे-पाटील म्हणाले की, 'गेल्या अनेक वर्षांपासून जिल्ह्यात बंद असलेल्या वाळू उपशाला अखेर शासनाकडून परवानगी मिळाली आहे. माळशिरस तालुक्यातील वाफेगाव येथील वाळू ठिकाणाहून जवळपास ५ हजार ब्रास, उंबरे (वे) येथून ५ हजार ब्रास, तर जांबुड येथून ८ हजार ब्रासचा वाळू उपसा होणार आहे. त्यामुळे मागणी करणाऱ्या लोकांना नव्या वाळू धोरणानुसार प्रति ब्रास ६०० रुपयांनी वाळू उपलब्ध करून देण्यात येणार आहे, असेही त्यांनी सांगितले.

यावेळी सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर, विधान परिषदेचे आमदार



रणजितसिंह मोहिते-पाटील, आमदार सचिन कल्याणशेट्टी, राजकुमार पाटील, रविंद्र पाटील, शशिकांत चव्हाण, जयंत आसगांवकर, जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर, तुषार ठोंबरे, अप्पर जिल्हाधिकारी सोलापूर, सुरेश शेजुळ, तहसीलदार माळशिरस, नामदेव टिळेकर उपविभागीय अधिकारी अकलूज, जांबुड ग्रामपंचायत सरपंच स्वाती खटके, उपसरपंच सुहास यादव, ग्रामपंचायत सदस्य विश्रांती कचरे, सुजाता माने, हर्षवर्धन भोसले, समाधान नाईकनवरे, बिरू थोरात, सचिन चंदनशिवे, सुमित भोसले, अर्जुन अडसुळ, भिमराव खटके, सतीश पवार, शिवाजी केचे, हणमंत बेलदर, राहुल खटके, संदीप सुरेश घाडगे, राहुल बिडवे, दादासाहेब माने, ग्रामसेवक जाधव साहेब, शहाजी कचरे यांच्यासह नागरिक उपस्थित होते.

## महत्त्वाचे वृत्त

### ताडोबात काळ्या बिबट्यांची संख्या वाढली

**चंद्रपूर** : ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पात काळ्या बिबट्यांची संख्या वाढली आहे. त्यामुळेच ताडोबात आता काळ्या बिबट्याचे पर्यटकांना हमखास दर्शन होत आहे. नुकताच मोहर्ली परिसरात पर्यटकांना काळा बिबट्या दिसला. त्याची व्हिडिओ चित्रफित समाजमाध्यमात फिरत आहे. ताडोबा प्रकल्प पट्टेदार वाघाच्या मनसोक्त दर्शनासाठी प्रसिद्ध आहे. बिबट्यादेखील येथे हमखास दर्शन देतो. मात्र, मागील काही दिवसांपासून आता येथे सातत्याने काळा बिबट्या पर्यटकांना आकर्षित करत आहे. काही दिवसांपूर्वी मादी बिबट्या दोन काळ्या पिल्लांसह जंगलात भ्रमंती करताना दिसली होती.

### बारबारलांवर उधळल्या नोटा

**नागपूर** : एका वृद्ध व्यवस्थापकाला लुटल्यानंतर बारबालावर लाखो रुपये उधळणाऱ्या दोघांना जरीपटका पोलिसांनी मुंबईत अटक केली. दोघांच्या मुसक्या आवळल्यानंतर त्यांना नागपुरात आणले. न्यायालयाने दोघांनाही एक दिवसाची पोलीस कोठडीत सुनावली. तपीश बागडे आणि रुषभ कावळे, रा. जरीपटका अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत.

### भारतीय मोहरीची जगभरात मोहिनी

**पुणे** : देशात तयार होणाऱ्या बिगर जनुकीय सुधारित तेलबियांच्या मोहरी, सोयाबीन, शेंगपेंडीला जगभरातून मागणी वाढली आहे. अमेरिका, युरोपसह आग्नेय आशियाई देशाला होणाऱ्या निर्यातीत ५९ टक्क्यांनी वाढ झाली आहे. एप्रिल, मे २०२२च्या तुलनेत यंदाच्या एप्रिल, मे २०२३ मधील निर्यातीत ५९ टक्क्यांनी वाढ झाली आहे. एप्रिल, मे २०२३ मध्ये ९,३०,०४४ टन निर्यात झाली आहे. फक्त मे महिन्याचा विचार करता निर्यातीत ७२ टक्क्यांनी वाढ झाली आहे. मे २०२३ मध्ये ४,३६,५९६ टन निर्यात झाली आहे.

### दुधात भेसळ करणाऱ्याविरुध्द 'मोक्का'

**पुणे** : दूध भेसळ करणारे आणि भेसळयुक्त दुध खरेदी करणाऱ्या खासगी किंवा सहकारी दूध संस्थांवर गुन्हे दाखल करण्यात येणार असून त्यांच्यावर 'मोक्का' अंतर्गत कारवाई करण्यात येईल, असे दुग्धविकासमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी सांगितले. कठोर कारवाईमुळे भेसळयुक्त दुधाला आळा बसेल, असा दावाही विखे -पाटील यांनी यावेळी केला. जिल्हाधिकारी कार्यालयात दुधाचा दर ठरविण्याबाबत आयोजित बैठकीनंतर पत्रकारांशी बोलताना दुग्धविकास मंत्री विखे-पाटील म्हणाले की, 'दुधामध्ये होणारी भेसळ हा प्रश्न गंभीर आहे.'

### देशातील रस्ते अमेरिकेपेक्षा सुसज्ज करणार

**मुंबई** : भारताची अर्थव्यवस्था आणि वाहन उद्योग जगात पहिल्या क्रमांकावर जाईल, असे प्रतिपादन करीत केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी केले. महाराष्ट्रातील तर सोडाच, पण उत्तर प्रदेश आणि बिहारमधील रस्तेही २०२४ पर्यंत अमेरिकेतील रस्त्यांपेक्षाही चांगले होतील, असा दावाही त्यांनी केला. रिवहन विभागातील (आरटीओ) भ्रष्टाचार संपला असून सागरी विमानाने मुंबईतील समुद्रातून उडून जयपूरच्या तलावात आणि तेथून कोलकात्यालाही जाता येईल, हे दिवसही आता फार दूर नसल्याचे गडकरी यांनी नमूद केले. मुंबई महापालिकेने सर्व विद्युत बसगाड्या चालविल्या, तर सध्याच्या एकतृतीयांश तिकिटदरातही नफा कमावता येईल, असा दावाही त्यांनी केला.

### राज्यात होणार नऊ नवे आरटीओ कार्यालये

**पुणे** : राज्य सरकारने नऊ नवीन प्रादेशिक परिवहन कार्यालयांची (आरटीओ) निर्मिती केली आहे. यासाठी राज्यातील नऊ उपप्रादेशिक परिवहन कार्यालयांचे रुपांतर आरटीओमध्ये करण्याचा आदेश गृह विभागाने शुक्रवारी काढला. नवीन आरटीओंमध्ये पिंपरी-चिंचवड, सातारा, बोरीवली, अहमदनगरचा समावेश आहे. राज्यातील एकूण नऊ उपप्रादेशिक परिवहन कार्यालयांचे रूपांतर आरटीओमध्ये करण्यात आले. त्यात पिंपरी-चिंचवड, जळगाव, सोलापूर, अहमदनगर, वसई (जि. पालघर), चंद्रपूर, अकोला, बोरीवली आणि सातारा यांचा समावेश आहे. यामुळे सोलापूर हे आता वेगळे आरटीओ असेल. सोलापूर अंतर्गत अकलूज उपप्रादेशिक कार्यालय असेल.

### डान्सबारमधील लपाछपीवर चाप

**ठाणे** : नियमबाह्य पद्धतीने सुरू असलेल्या ठाण्यातील डान्सबारमध्ये पोलिसांचे छापे पडताच बारबाला खास बनवलेल्या छुप्या खोल्यांमध्ये जाऊन लपतात. या खोल्यांवर कारवाई करण्यासाठी पोलिसांनी आता कंबर कसली आहे. छाप्यांदरम्यान या खोल्यांमध्ये लपवल्या जाणाऱ्या बारबाला गुदमरून दुर्घटना घडण्याची शक्यता ओळखून पोलिसांनी त्यांच्या हद्दीतील बारच्या नावांसह त्यातील अनधिकृत बांधकामांची यादीच संबंधित पालिका प्रशासन, एमएमआरडीएला पाठवली आहे. त्यानुसार या अनधिकृत बांधकामांवर कारवाई करून संबंधित बारचालक-मालकांवर कारवाई करावी, ही विनंतीही पोलिसांनी यंत्रणांना केली आहे.

### शेतकरीपुत्राची विठुरायाचरणी अनोखी भेट

**बीड** : शेतकऱ्यांच्या हितासाठी, शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी आणि शेतकऱ्यावर आस्मानी संकट येऊ नये म्हणून बीडचा शेतकरी पुत्र श्रीकांत गदळे याने पंढरीच्या विठुरायासाठी चंदन आणि सागवान निर्मित कोरीव अशी पादुकांची वीट तयार केली आहे. श्रीकांत तयार केलेली पादुकांची वीट पंढरीनाथाच्या चरणी अर्पण करणार आहे. वारीत पंढरीच्या विठुरायासाठी अनेक वारकरी विविध प्रकारच्या भेटवस्तू घेऊन जात असतात. विठुरायाला घातलेले साकडे पूर्ण झाल्यानंतर अनेक भक्त नवस देखील पूर्ण करत असतात.

### आयुक्तपदावरुन भाजप-शिवसेनेत रस्सीखेच

**बीड** : नाशिक महापालिकेच्या आयुक्तपदी आपल्या मर्जीतला अधिकारी यावा यासाठी भाजप आणि शिवसेनेत (शिंदे गट) रस्सीखेच सुरू आहे. या दोन्ही पक्षांच्या रस्सीखेचीत तीन आठवडे उलटूनही नाशिकला पूर्णवेळ आयुक्त मिळत नसल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. आयुक्तपदावरून आजी-माजी पालकमंत्र्यांमध्ये शीतयुद्ध सुरू असल्यामुळे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नाशिकची फाइल बाजूला ठेवल्याची चर्चा आहे. त्यामुळे आयुक्तपदाच्या नावावरून भाजप-शिवसेनेचा मेळ जमत नसल्याने नाशिककरांच्या प्रश्नांशी दररोज खेळ सुरू आहे.

### पाटण्यातील बैठकीमुळे मविआला बळ

**मुंबई** : पाटण्यात झालेल्या विरोधकांच्या बैठकीत भाजपच्या विरोधात देश पातळीवर एकत्रित लढण्यावर विरोधकांचे एकमत झाल्याने राज्यातही महाविकास आघाडीला बळ मिळणार आहे. जागावाटपाचा तिढा सोडविण्याचे तिन्ही पक्षांसमोर मोठे आव्हान असेल. या बैठकीत भाजपला पराभूत करण्याकरिता एकत्रित निवडणूक लढविण्यावर सहमती झाली. राज्यात शिवसेना, राष्ट्रवादी आणि काँग्रेसने एकत्र लढण्याचे तत्त्वत: मान्य केले असले तरी अधूनमधून स्वबळाचे नारे दिले जातात. पाटण्यातील बैठकीत एकत्र लढण्यावर सहमती झाल्याने राज्यात काँग्रेस नेत्यांना आघाडीचा निर्णय मान्य करावा लागणार आहे.

### अंत्यसंस्कारासाठी येणाऱ्यांचा रोप भेट

**अमरावती** : शहरातील हिंदू स्मशानभूमीत अंतिम संस्कारासाठी येणाऱ्या मृतांच्या नातेवाइकांना रोपटे भेट देऊन त्यांचे संवर्धन करण्याची विनंती केली जाणार आहे. यामुळे वृक्षारोपणाला तर प्रोत्साहन मिळेल, तसेच मृत व्यक्तींच्या स्मरणार्थ लावल्या जाणाऱ्या रोपट्याचेही संगोपन होणार आहे. येत्या १ जुलैपासून या उपक्रमाला सुरूवात होणार आहे.

## कोल्हापूर हादरले

# प्रसिद्ध उद्योगपती शिंदेंनी पत्नी, मुलासह आयुष्य संपवले

**सुराज्य/कोल्हापूर**

**जिल्ह्यातील गडहिंग्लज शहरातील प्रसिद्ध उद्योगपती संतोष शिंदे यांनी आपली पत्नी व मुलांसह राहत्या घरात विषारी औषध पिऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. उद्योगपती संतोष शिंदे यांच्यावर काही दिवसांपूर्वी बलात्काराचा आरोप करण्यात आला होता. या आरोपाखाली ते जेलमध्ये देखील जाऊन आले होते. यानंतर ते तणावाखाली होते. त्या तणावामुळेच त्यांनी आत्महत्या केली असावी, असा प्राथमिक अंदाज वर्तवण्यात येत आहे.**



गडहिंग्लज येथील उद्योगपती संतोष शिंदे यांनी अगदी लहान वयापासून कष्ट उपसून अर्जुन उद्योग समूहाची स्थापना केली होती. या अंतर्गत त्यांनी तेल उत्पादन, व्यायामशाळा, बेकरी उत्पादन यासह विविध उत्पादन सुरू केले. त्यांच्या या उत्पादनाला ग्राहकांकडून मोठी मागणी होती. त्यांचा हा व्यवसाय महाराष्ट्रासह मुंबई आणि कर्नाटकात देखील विस्तारला होता.

दरम्यान गेल्या काही दिवसांपूर्वी त्यांच्यावर बलात्काराचा आरोप करण्यात आला होता. या आरोपाखाली ते महिनाभर जेलमध्येदेखील होते. यानंतर ते बाहेर आले.

तुरुंगातून आल्यानंतर पुन्हा नव्याने उभे राहण्याचा त्यांनी प्रयत्न केला. मात्र, त्यांना यामध्ये अपयश आले. यामुळे ते तणावाखाली होते. दरम्यान, शनिवारी सकाळी ते बेडरूमचा दरवाजा उघडत नसल्याने त्यांच्या आईने शेजाऱ्यांना बोलावले आणि दरवाजा तोडून आतमध्ये प्रवेश केला. यावेळी बेडरूममध्ये संतोष शिंदे, त्यांची पत्नी आणि मुलाचे मृतदेह आढळले.

प्राथमिक अंदाजानुसार, सुरुवातीला विष पिऊन व त्यानंतर गळ्यावर सुरी फिरवून घेऊन त्यांनी जीवन संपवल्याचे दिसून आले आहे. संतोष शिंदे यांनी कोरोना काळात बरेच सामाजिक काम केले होते. आता अशा परिस्थितीत ते जीवन संपवतील, असे कोणालाही वाटले नव्हते.

या दुर्दैवी घटनेमुळे गडहिंग्लजमध्ये एकच खळबळ उडाली असून सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

### आत्महत्येच्या ठिकाणी सुसाईड नोट

संतोष शिंदे यांनी कुटुंबासह आत्महत्या करण्यापूर्वी चिठ्ठी लिहून ठेवली होती. शहरातील ज्या महिलेने शिंदे यांच्या विरोधात बलात्काराची तक्रार दिली तिचे व तिच्या साथीदाराचे नाव या चिठ्ठीत लिहून त्यांच्यामुळे आत्महत्या केल्याचे म्हटले आहे. त्यांना अटक केल्याशिवाय मृतदेह हलवू नये, अशी भूमिका नागरिकांनी घेतली. शहरातून सर्वपक्षीय कार्यकर्त्यांनी फेरी मारून बंदचे आवाहन करत त्या दोघांना अटक करण्याची मागणी केली आहे.

# मुंबई-पुण्यात मुसळधार पाऊस

**सुराज्य/मुंबई**

महाराष्ट्रातल्या बहुतेक जिल्ह्यांमध्ये शनिवारी पावसाने हजेरी लावली. सकाळपासूनच मुंबई, ठाणे, नवी मुंबई आणि उपनगरांमध्ये तर पुण्यात जोरदार पाऊस झाला. पुण्यात मान्सून दाखल झाल्याची माहिती हवामान खात्याकडून देण्यात आली आहे. पण मुंबईत झालेला पाऊस हा मोसमी पाऊस होता का? यासंदर्भात अद्याप हवामान खात्याकडून कोणतेही अपडेट देण्यात आले नाही. मात्र, येत्या २४ तासांत मान्सून मुंबईला



भिजवणार, अशी शक्यता हवामान खात्याकडून वर्तवण्यात आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, शनिवारी सकाळपासून मुंबईसह उपनगरात पावसाला सुरुवात झाली आहे. राज्यात यंदा मान्सूनचे आगमन उशिरा झालं आणि बिपरजॉय चक्रीवादळाचा मान्सूनच्या प्रगतीवर मोठा परिणाम झाला. मात्र, चक्रीवादळाचा प्रभाव कमी होताच मान्सून पुन्हा सक्रिय झाला आहे. शुक्रवारी मान्सूनने विदर्भात हजेरी लावल्यानंतर आता पुढे सरकत पुण्यातही पाऊस झाला. यामुळे उन्हाच्या तडाख्यापासून नागरिकांना दिलासा मिळाला आहे.

## ठाकरेंचा फडणवीसांना इशारा

# देवेंद्रजी पातळी सांभाळा...

**सुराज्य/मुंबई**

'आम्ही पाटण्याला विरोधी नेत्यांच्या बैठकीला गेलो, तर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, 'हे परिवार बचाओ' बैठकीला गेले आहेत. देवेंद्रजी एवढ्या पातळीवर येऊ नका, परिवार तुम्हालाही आहे, तुमच्या परिवाराचे व्हॉट्सअॅप बाहेर येत आहेत, अशा शब्दात उद्धव ठाकरे यांनी इशारा दिला.

मुंबईतील ठाकरे गटाचे प्रमुख पदाधिकारी-शाखाप्रमुख यांचा शिवाजी मंदिर नाट्यगृहात मेळावा आयोजित करण्यात आला होता. यावेळी उद्धव ठाकरे शिवसैनिकांना संबोधित करत होते.

**उद्धव ठाकरे काय म्हणाले?**

एक जुलैला मुंबई



महापालिकेवर मोर्चा काढणार आहोत. कोव्हिड काळातील भ्रष्टाचार हे बाहेर काढत आहेत. पण त्या काळात सातत्याने सर्व्हे होत होते, मी माझं कौतुक सांगत नाही, पण त्यावेळी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री हे देशात सर्वोत्तम कामगिरी करत असल्याचं सर्वे क्षणांचं निरीक्षण होतं. ही यांची पोटदुखी आहे. कारण भाजपच्या एकाही मुख्यमंत्र्याचं नाव या यादीत नाही, असं उद्धव ठाकरे म्हणाले.

'देवेंद्रजी, तुम्ही तुमचं घर सांभाळा, आमच्या घरापर्यंत येऊ नका, नाहीतर आम्हाला तुमच्या घरात जावं लागेल, नाहीतर हिंदूत्वाची अब्रू निघेल, असा इशारा भाषणाच्या शेवटी उद्धव ठाकरे यांनी दिला.'

# रायगड जिल्ह्यात पावसाळी पर्यटनावर बंदी

**सुराज्य/अलिबाग**

पावसाळ्यात सहलीदरम्यान पर्यटकांच्या होणाऱ्या मृत्यूची दखल घेऊन, जिल्हा प्रशासनाने देवकुंड धबधबा, सिक्रेट पॉईंट आणि ताम्हाणी घाटातील वर्षा सहलींवर बंदी घातली आहे. मात्र, या निर्णयामुळे पर्यटन व्यवसाय धोक्यात येण्याची शक्यता आहे. स्थानिकांचा रोजगार बुडणार असल्याने योग्य खबरदारी घेऊन वर्षा पर्यटन सुरू ठेवण्याची विनंती स्थानिकांनी केली आहे.

सहलीसाठी येणारे पर्यटक दगावण्याच्या घटना नवीन नाहीत. गेल्या दोन वर्षांत ३५ हून अधिक पर्यटकांचा बुडून मृत्यू झाला आहे. यात प्रामुख्याने कर्जत, खोपोली, मुरुड आणि माणगाव पावसाळी पर्यटन केंद्रांचा समावेश आहे. या दुर्घटनांना पर्यटकांचा आततायीपणा कारणीभूत ठरतो आहे. मद्यप्राशन करून पाण्यात उतरणे, स्थानिकांच्या सुचनांकडे दुर्लक्ष करणे, भौगोलिक परिस्थितीचे ज्ञान नसणे यासारखे घटक यास कारणीभूत ठरत आहेत.

जिल्ह्यात सातत्याने घडणाऱ्या या दुर्घटना लक्षात घेऊन देवकुंड धबधबा, सिक्रेट पॉईंट आणि ताम्हाणी घाटातील पावसाळी पर्यटन केंद्रांवर प्रवेश बंदी घालण्यात आली आहे. याबाबतचे आदेश माणगावचे उपविभागीय अधिकारी उमेश बिरारी यांनी जारी केले आहेत. पण या आदेशानंतर बराच गदारोळ उडाला. पर्यटकांनी याबाबत नाराजी व्यक्त केली. स्थानिकांचे रोजगार बुडत असल्याने त्यांनीही यावर आक्षेप नोंदवला. अखेर प्रशासनाने ही बंदी मागे घ्यावी, अशी मागणी केली जात आहे.

# जयंत पाटील यांच्या संबंधित बँकेत छापेमारी

**सुराज्य/मुंबई**

ईडी म्हणजेच अंमलबजावणी संचलनालयाने पश्चिम महाराष्ट्रात विशेष म्हणजे सांगली जिल्ह्यात १४ ठिकाणी छापेमारी केली.

### ईडी अॅक्शन मोडमध्ये

या छापेमारीत राजारामबापू सहकारी बँकेच्या कार्यालयाचा देखील समावेश आहे. विशेष बाब म्हणजे ही बँक राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्याशी संबंधित आहेत. दहा वर्षापूर्वी एक हजार कोटींचे संशयास्पद व्यवहार झाल्याचा संशय ईडीला आहे. ईडीकडून त्या प्रकरणी चौकशी केली जात आहे.

बँकेच्या कार्यालयासह चार्टर्ड अकाऊंटंटवर देखील ईडीला संशय आहे. सीएच्या मदतीनं

### हजार कोटींच्या घोटाळ्याचा संशय

काही कंपन्यांनी त्यांच्याकडील पैशांचे कमिशनसाठी संशयास्पद पद्धतीनं अवैध व्यवहार झाल्याचा ईडीला संशय आहे.

ईडीला शहरातील मोठमोठ्या कंपन्यांवर संशय आहे. कायदेशीर पैशाचं रोख पैशांमध्ये हव्या त्या पद्धतीनं खर्च जाहीर न करता रुपांतर करण्यात सीएंनी मदत केल्याचा संशय ईडीला आहे.

ईडीला त्या रकमेचा वापर लाच देण्यासाठी झाला असाव असा संशय आहे.राजारामबापू



सहकारी बँकेमध्ये बोगस केवायसी कागदपत्रांच्या आधारे खाती उघडण्यात आली. त्यानंतर मोठी रक्कम वेगवेगळ्या खात्यात वर्ग करण्यात आली, असा दावा ईडीचा आहे.

त्यानंतर त्या खात्यातून बँकेतून रक्कम रोख रकमेच्या स्वरुपात काढण्यात आली. याबद्दल माहिती देण्यात बँक अयशस्वी ठरल्याचं ईडीनं म्हटलं आहे.

### मान्सून विदर्भात दाखल पण उलटा प्रवास

**नागपूर** : मृग नक्षत्रात दडी मारून बसलेला पाऊस आर्द्राच्या आगमनापासून बरसू लागला आहे. शुक्रवारी चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यात मान्सून धडकला. अकोला आणि बुलढाणा वगळता इतर नऊ जिल्ह्यांमध्ये दमदार सरी कोसळल्या. उद्या, रविवारपर्यंत मान्सून संपूर्ण विदर्भ व्यापणार असल्याचा अंदाज आहे. या पावसामुळे तप्त उन्हाच्या झळा सहन करणाऱ्या वैदर्भीयांना दिलासा मिळाला आहे.

## शिक्षणाधिकारी काटोलकर यांची होणार चौकशी

**नागपूर** : ऑनलाइन वरिष्ठ श्रेणी व निवड श्रेणी प्रशिक्षणाबाबत पात्र शिक्षकांची दिशाभूल केल्याप्रकरणी, नागपूर जिल्ह्याचे माध्यमिक शिक्षणाधिकारी रवींद्र काटोलकर यांची चौकशी करण्याचे आदेश शिक्षण विभागाने दिले आहे.

राज्याच्या शिक्षण विभागाने ऑनलाइन वरिष्ठश्रेणी व निवडश्रेणी प्रशिक्षणाबाबतचा नावनोंदणी कार्यक्रम २६ मे रोजी जाहीर करण्यात आला. मात्र, नागपूर माध्यमिक शिक्षणाधिकारी रवींद्र काटोलकर यांनी १९ मे रोजीच शिक्षकांच्या नावनोंदणीकरिता पत्र निर्गमित केले होते. काटोलकर यांच्या पत्रामुळे मुख्याध्यापक आणि शिक्षकांना त्रास सहन करावा लागला. शिक्षणाधिकाऱ्यांनी मुख्याध्यापक आणि वरिष्ठश्रेणी व निवडश्रेणीसाठी पात्र शिक्षकांची दिशाभूल केली, असे पत्र नागपूर विभागाचे शिक्षक आ. सुधाकर अडबाले यांनी शालेय शिक्षण व क्रीडा विभागाला दिले होते.

## परिचारिका बहिणींचा सन्मान

**सुराज्य/पुणे** : गेल्या चार दशकांपासून लष्करी परिचर्या सेवेत राहून देशभरातील विविध ठिकाणी लष्करी जवानांची सेवा करणाऱ्या दोन सख्ख्या बहिणींना मानाचा राष्ट्रीय फ्लॉरेन्स नाइटिंगेल पुरस्कार प्राप्त झाला आहे.

मेजर जनरल स्मिता देवराणी व ब्रिगेडियर अमिता देवराणी अशी या दोन भगिनींची नावे असून स्मिता यांना २०२२ साठीचा व अमिता यांना २०२३ साठीचा पुरस्कार राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते नुकताच प्रदान करण्यात आला.



चार दशकांपासून जवानांची सेवा करणाऱ्या हातांचा गौरव

## केंद्र राज्याच्या आरोग्य योजनांची एकत्रित अंमलबजावणी

# १२ कोटी नागरिकांना संयुक्त कार्ड

**सुराज्य/मुंबई**

'आयुष्मान भारत आणि महात्मा जोतिराव फुले जनआरोग्य योजना एकीकृत पद्धतीने राबवून महाराष्ट्रातील संपूर्ण १२ कोटी नागरिकांना संयुक्त कार्ड देण्यात येणार आहे. या योजनेतून पाच लाखांपर्यंत शस्त्रक्रियांसह उपचार मोफत करण्यात येणार आहेत,' अशी माहिती केंद्रीय आरोग्यमंत्री मनसुख मांडविया यांनी शुक्रवारी मुंबईत दिली आहे.

आयुष्मान भारत योजनेची आढावा बैठक सह्याद्री अतिथीगृहात पार पडली. यावेळी केंद्रीय आरोग्यमंत्री मांडविया बोलत होते. याप्रसंगी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, नॅशनल हेल्थ ऑथॉरिटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी एस. गोपालकृष्णन, उपसंचालक रोहित झा, आरोग्य विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, आरोग्य सेवा आयुक्त धीरज कुमार आदी अधिकारी उपस्थित होते.

जनऔषधी केंद्र अधिक संख्येने उघडण्यात येणार असून त्यातून नागरिकांना स्वस्तात औषधे उपलब्ध होणार आहेत. बाजारपेठेतील औषधांच्या किंमतींपेक्षा अर्ध्या किंमतींत औषधे मिळतील. प्रत्येक जिल्ह्यात ५० खाटांचे 'एक क्रिटीकल केअर युनिट' ऑक्सिजन

### पाच लाखांपर्यंत उपचार

सुविधेसह उघडण्यात येणार आहे. त्यासाठीही केंद्र सरकार मदत करणार आहे,' असे मांडविया यांनी सांगितले.

राज्यात दोन्ही योजनांचे एकच कार्ड करण्याच्या सूचना मांडविया यांनी केली. केंद्राची व राज्याची योजना समन्वयाने राबवल्यास केंद्र सरकारचा ६० टक्के निधी मिळतो.



### आरोग्य यंत्रणा बळकट करावी

'केंद्राच्या यादीप्रमाणे १९०० आजार यात समाविष्ट करून येत्या एक महिन्यात एक कोटी आणि सहा महिन्यांत १० कोटी लोकांना हे कार्ड वितरित करण्याचा प्रयत्न करणार आहे, असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. महात्मा फुले जनआरोग्य योजनेची प्रतिकुटुंब खर्च मर्यादा पाच लाख रुपये करण्यात येत आहे. पंतप्रधान जनआरोग्य योजनेची प्रतिकुटुंब खर्च मर्यादाही सारखीच राहणार आहे. योजनांच्या अंमलबजावणीचे काम मिशन मोडवर करावे. केंद्र सरकारचा निधी पूर्णपणे खर्च करावा, त्यातून राज्याची आरोग्य यंत्रणा बळकट करावी, असे फडणवीस म्हणाले.'

राज्याची बचत होते. त्यासाठी भारत सरकार आयुष्मान केंद्र योजनेला व्यापक स्वरूप देत आहे. समन्वित योजनेतून लाभार्थ्याला त्याच्या आजारावर किती पैसे खर्च केले, याचा संदेश जाणार आहे. तसेच रुग्णालयांना रक्कमही लवकर मिळणार आहे. वेबसाइटवरून लाभार्थी स्वतः आपले कार्ड डाऊनलोड करू शकतो. गावातही त्याला कार्ड मिळेल. गावातील कार्डधारकांची यादी ग्रामसभेकडे असेल,' असे ते म्हणाले.






अकलूज येथील स.मा.वि.च्या मैदानावर पार पडलेले जिल्ह्यातील नेत्रदिपक असे गोल रिंगण



# तुकाराम महाराजांच्या रिंगण सोहळ्यावर हेलिकॉप्टरमधून पुष्पवृष्टी

✔ सुराज्य/डी. एस. गायकवाड

**तुकाराम महाराजांच्या पालखी सोहळ्यात झालेल्या अकलूज येथे झालेल्या रिंगण सोहळ्यावर हेलिकॉप्टर मधून पुष्पवृष्टी करण्यात आली हे या रिंगण सोहळ्याचे आणखी एक आकर्षण ठरले. रिंगण सोहळ्यासाठी आमदार रणजितसिंह मोहिते पाटील, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, आमदार राम सातपुते, माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे, जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर, मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी, जिल्हा पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, अतिरिक्त जिल्हाधिकारी तुषार ठोंबरे,उपविभागीय अधिकारी नामदेव टिळेकर यांच्यासह मान्यवर पदाधिकारी अधिकारी, वारकरी भाविक आणि अकलूज व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. पालकमंत्र्यांनी केले सारथ्य.**


पालखी सोहळ्यात सहभागी झालेल्या महिलांनी डोक्यावर तुळस घेत धावा केला.

पालखी स्वागतानंतर पालखीच्या स्वागत ठिकाणापासू पालखीच्या रथाचे सारथ्य पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले. यावेळी रथात जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर, मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी उपस्थित होते. पालखी स्वागत सोहळ्यापूर्वी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी यांनी पालखी मार्गावर तात्पुरत्या स्वरूपात उभारण्यात आलेल्या आरोग्य केंद्रास भेट देऊन आरोग्य सेवेची माहिती घेतली. यावेळी त्यांच्या हस्ते भाविकांना ओआरएस पाकिटाचे वितरण करण्यात आले. तद्नंतर गळ्यात वीणा घेऊन पालकमंत्री विखे पाटील पालखी सोहळ्यात सहभागी झाले. अकलूज येथील गांधी चौकात अकलूज नगरपरिषदेच्यावतीने जगदगुरु संत तुकाराम महाराज यांच्या पालखीचे स्वागत केले.

### अमेरिकन राजदूताची उपस्थिती

सदाशिवराव माने विद्यालयाच्या प्रांगणात झालेल्या संत तुकाराम महाराज पालखी पालखी सोहळ्याचा सुखद अनुभव घेण्यासाठी देश विदेशातून भाविक येत असतात. यंदाच्या वर्षी अमेरिकेचे राजदूत माईक हेनकी हे आवर्जून हा रिंगण सोहळा पाहण्यासाठी उपस्थितीत होते.

**नेत्रदीपक रिंगण सोहळा :** जगदगुरु संत तुकाराम महाराज पालखीचे सोलापूर जिल्ह्यातील पहिले गोल रिंगण अकलूज येथील सदाशिवराव माने विद्यालयाच्या प्रांगणात झाले. पताका, हांडे-तुळशी, विणेकरी, मृदंग व टाळकरी यांचे रिंगण झाले. तद्नंतर आमदार रणजितसिंह मोहिते पाटील यांनी सपत्नीक अश्व पूजन केले. त्यानंतर अश्व रिंगणी धावले. अश्वाचे रिंगणी धावणे उपस्थित अकलूजकरांसाठी एक पर्वणीच ठरली. भक्तिमय वातावरणात पार पडलेला रिंगण सोहळा याची देही याची डोळा अनुभवता आला. डोळ्यात साठवावा अशा नेत्रदीपक रिंगण सोहळ्याचा अभूतपूर्व आनंद प्रत्येक भाविक वारकऱ्यांना सुखावून गेला.


तुकाराम पालखी सोहळ्यात सहभागी झालेले पालकमंत्री विखे-पाटील, जिल्हाधिकारी मिलींद शंभरकर

## ठाकूर बुवा येथे रिंगण सोहळ्याची तयारी


✔ **वेळापूर :** संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याचा वेळापूर येथील पालखी सोहळ्याचा मुक्काम संपवून २६ जून रोजी पालखी सोहळा उघडेवाडी हद्दीत प्रवेश करणार आहे. या ठिकाणी ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याचे तिसरे गोल रिंगण ठाकूर बुवा येथे होत आहे. या रिंगण सोहळ्याची उघडेवाडी ग्रामपंचायत यांच्यावतीने जय्यत तयारी करण्यात आली असल्याचे उघडेवाडी सरपंच जिजाबाई गवळी यांनी सांगितले. ठाकूर बुवा येथे विश्रांती सभा कक्ष, हिरकणी कक्ष, आरोग्य कक्ष याची उभारणी करण्यात आली आहे. पाणी शुद्धीकरण करण्यात



आले आहे. संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याचे स्वागत मानकरी भगत, कोळेकर, व्यवहारे आणि उघडेवाडी सरपंच जिजाबाई गवळी, उपसरपंच सौ सीमाली धनंजय साठे, ग्रामविकास अधिकारी पांडुरंग ठवरे व ग्रामपंचायतचे सर्व सदस्य यांच्या वतीने करण्यात येणार आहे. यावेळी कदम माधव खंडू, उघडे गिरीजा सयाजी, पवार संगीता सुरेश, चौगुले नितीन कुमार बबनराव, घोगरे महेंद्र महादेव, सरते अंजली सागर, उबाळे लक्ष्मी शिवाजी, काटकर सोनाली अशोक, संग्राम माने देशमुख, कोळेकर प्रतिभा पोपट व ग्रामपंचायत सदस्य उपस्थित होते.

### शिवरत्न सेमी इंग्लिश स्कूलमध्ये निघाली बालदिंडी

✔ **अकलूज :** भाळी चंदनाचा टिळा लावून मुखी हरिनामाचा जयघोष करत शिवरत्न सेमी इंग्लिश स्कूल आणि जिल्हा परिषद केंद्र शाळा यशवंतनगर यांच्या सौजन्याने पालखी सोहळ्यानिमित्त पायी दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. प्रिन्सिपल जितेंद्र माने देशमुख आणि जिल्हा परिषद केंद्र शाळा यशवंतनगर चे मुख्याध्यापक बंडू खडतरे यांच्या हस्ते पूजन करण्यात आले. प्रा. सुवर्णा निंबाळकर यांच्या मार्गदर्शनाखाली बसवलेल्या विठ्ठल नामाची शाळा भरली हे नृत्य सादर करून ही दिंडी शाळेतून निघून कीर्तीनगर, यशवंतनगर या भागातून



काढण्यात आली. पिंटू चौगुले यांनी विद्यार्थ्यांची नाश्त्याची सोय केली. त्यानंतर पायी दिंडी शाळेत पोहोचताच शाळेच्या मैदानावर रिंगण सोहळा पार पडला रिंगण सोहळ्यानंतर मुख्याध्यापकांसह सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि बालचमुंनी यावेळी मनसोक्तपणे फुगडीचा आनंद घेतला.

# पुरंदावडे येथे संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींचे पहिले गोल रिंगण उत्साहात

✔ सुराज्य/अकलूज

पुरंदावडे येथे सोहळ्यातील पहिले गोल रिंगण असल्याने हा रिंगण सोहळा पाहण्यासाठी भाविकांनी प्रचंड गर्दी केली होती. माऊलींची पालखी रिंगणाच्या मध्यभागी पोहोचताच माजी सभापती वैष्णवीदेवी मोहिते पाटील व उपसभापती अर्जुनसिंह मोहिते पाटील यांनी माऊलींच्या पादुकांची पूजा करुन दर्शन घेतले. त्यानंतर काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले व जिल्हाध्यक्ष डॉ धवलसिंह मोहिते पाटील व मान्यवरांनी दर्शन घेतल्यानंतर रिंगण सोहळ्याला सुरुवात झाली.

हुलकावणी देणाऱ्या पर्जन्यराजाने रिंगण सोहळ्यात हजेरी लावीत माऊलीसह वैष्णवांवर जलाभिषेक केला. पावसाच्या सरी अंगावर झेलीत मोती या

नातेपुते परिसरातील नागरीकांनी दर्शनासाठी प्रचंड गर्दी केली होती. पहाटे घंटानाद झाला आणि माऊलींची माळशिरसकडे निघण्याची तयारी सुरु झाली. पहाटेची विधीवत पूजा व आरती प्रमुख विश्वस्थ योगेश देसाई यांच्या हस्ते करण्यात आली. सकाळी ६ वाजता सोहळा मार्गस्थ झाला सकाळच्या विसाव्यालाच दुपारचे भोजन व विश्रांती असल्याने स्वयंपाकाची वाहने पहाटेच मांडवे ओढा येथे पोहोचली होती. सकाळी ९ वाजता सोहळा मांडवे ओढा येथे पोहोचला.

माऊलींच्या व हीरा या स्वाराच्या अश्वाने दोन प्रदक्षिणा पूर्ण केल्या. पर्जन्यराजाचे आगमन व अश्वांच्या नेत्रदीपक दौडीने वारकऱ्यांमध्ये उत्साह संचारला. या उत्साहातच उडींचा कार्यक्रम अत्यंत



उत्साही व भक्तिमय वातावरणात पार पडला. येळीव येथील अल्पशा विश्रांतीनंतर सोहळा पडत्या पावसातच माळशिरस मुक्कामी पोहोचला. येथे नगराध्यक्ष डॉ आप्पासाहेब देशमुख व नगरवासीयांनी सोहळ्याचे स्वागत केले. तत्पूर्वी नातेपुते मुक्कामी सायंकाळी पावसाने सोहळ्यावर गुलाब पाण्याप्रमाणे हलकासा शिडकाव केला. या शिडकाव्याने वारकऱ्यांना पावसाची चाहूल लागली. आता पाऊस बरसणार या आनंदातच ते झोपी गेले. सदाशिवनगर येथील श्री शंकर सहकारी साखर कारखाना, कर्मवीर बाबासाहेब माने पाटील कनिष्ठ महाविद्यालयाच्या वतीने वारकऱ्यांनी येथे अन्नदान करण्यात आले. भोजनानंतर सोहळा सकाळी ११ वाजता पुरंदावडेकडे मार्गस्थ झाला. पालखी सोहळा शंकर सहकारी साखर कारखान्याच्या हद्दीत सदाशिवनगर येथे पोहोचला त्यावेळी सरपंच विरकुमार दोशी, उपसरपंच उदय धाईंजे यांनी सोहळ्याचे स्वागत केले. त्यानंतर सोहळा पुरंदावडे हद्दीत पोहोचला. येथे सरपंच राणी बापू मोहिते, उपसरपंच देवीदास ढोपे, ग्रामसेवक दिक्षीत, चेअरमन बाळासाहेब सुळे पाटील, हरी राऊत, सुनील ढगे, पोपट गरगडे, संतोष शिंदे व ग्रामस्थांनी स्वागत केले. आखींव रेखींव रिंगण सोहळ्यात अश्वासह माऊली आल्यानंतर रिंगण सोहळ्याला सुरुवात झाली. प्रथम श्रीमंत उर्जितसिंह शितोळे सरकार, सोहळा प्रमुख ॲड. विकास ढगे पाटील यांनी रिंगणाची पाहणी केली.

## मुंबईची 'माऊली' वारकऱ्यांच्या सेवेसाठी सरसावली

✔ सुराज्य/पंढरपूर

मुखी हरिनामाचा जयघोष करत पांडुरंगाच्या दर्शनाची आस लावून वारकरी पंढरपूरच्या दिशेने मार्गस्थ होत आहेत.

महाराष्ट्राला हजारो वर्षांची वारकरी परंपरा आहे. संत ज्ञानोबा माऊली आणि संत तुकाराम महाराज पालखींसोबत राज्याच्या विविध कानाकोपऱ्यातून संतांच्या पालख्या पंढरपूरला जात असतात. यात काही वारकऱ्यांना आरोग्याचा त्रास होतो तेव्हा मुंबईची 'माऊली' वारकऱ्यांच्या सेवेसाठी दरवर्षी पुढे सरसावते. वारी दिंडीच्या पालखी मार्गावर अनेक संस्था वारकऱ्यांची सेवा करतात. त्यातील एक म्हणजे मुंबईतील माऊली चॅरिटेबल आणि मेडिकल ट्रस्ट. मागील ३१ वर्षापासून ही संस्था वारीत वैद्यकीय सेवा आणि औषधे मोफत पुरवत आहेत. यामध्ये मुंबई सह महाराष्ट्र आणि देशभरातील नामांकित असे ५०० पेक्षा जास्त डॉक्टर्स आणि सुसज्ज रुग्णवाहिका कार्यरत असतात. सध्या माळशिरसमध्ये माऊली ट्रस्टकडून कॅम्प उभारण्यात आला आहे. दरदिवशी साधारणपणे ३ हजार ते ५ हजार वारकरी या कॅम्पसमध्ये उपचार घेतात अशी माहिती दिंडी प्रमुख डॉ. दीपक मोहिते यांनी दिली.

**मोफत अन्नदान**

मुंबईतील दादर स्वामी समर्थ मठातून महाराजांच्या पादुकासोबत माऊली ट्रस्टची डॉक्टर दिंडी निघते. आळंदी ते पंढरपूर या मार्गावर ५ ठिकाणी वारकऱ्यांसाठी अन्नदान केले जाते. जेजुरी, वेळापूर, बंडी शेगाव, वाखरीला २ दिवस वारकऱ्यांना जेवण दिले जाते.



## शंकर कारखान्यातर्फे वारकऱ्यांना अन्नदान

✔ सुराज्य/अकलूज

सदाशिवनगर व पुरंदावडे मध्ये संत श्री ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखीचे आगमन झाले. यावेळी रिंगण सोहळ्याचे व माउलींच्या पालखीचे स्वागत, अश्वाचे पूजन पंचायत समितीचे माजी उपसभापती अर्जुनसिंह मोहिते पाटील यांच्या हस्ते सपत्नीक करण्यात आले. यावेळी वैष्णवीदेवी मोहिते-पाटील, विश्वतेजसिंह मोहिते-पाटील उपस्थित होते.

यावेळी बळीराजाने देखील माउलींच्या स्वागतासाठी आपली उपस्थिती दर्शविली. यावेळी आ. रणजितसिंह मोहिते पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली श्री शंकर सहकारी कारखाना लि सदाशिवनगर यांच्या वतीने १० हजार वारकऱ्यांना अन्नदान करण्यात आले. यावेळी सरपंच राणी मोहिते, देविदास ढोपे, सरपंच विरकुमार दोशी, उपसरपंच उदय धाईंजे, तानाजी ओवाळ, पोपट गरगडे, माऊली सूळ, विठ्ठल तात्या अर्जुन, पांडुरंग सालगुडे -पाटील, राहुल वाघमोडे, अरविंद भोसले, दादा वाघमोडे आदी उपस्थित होते. पालखी सोहळ्यातील वैष्णवांना सुमारे २४ हजार भाकरी व १२५ किलो बेसनाचे पिठले, ठेचा लोणचे अशा अस्सल ग्रामीण आस्वादाचे अन्नदान करण्यात आले. मुक्कामास येणाऱ्या वैष्णवांना अन्नदान व्हावे, त्यांना घरगुती भोजनाचा आस्वाद मिळावा या हेतूने आ. रणजितसिंह मोहिते पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली शंकर सहकारी कारखाना यांच्या वतीने वतीने अन्नदान करण्यात आले.

# सराटीत तुकाराम महाराजांच्या पादुकांना निरास्नान

✔ सुराज्य/अकलूज

संतश्रेष्ठ संत तुकाराम महाराजांचा पालखी सोहळा हा पंढरपूरकडे मार्गस्थ होत असताना पुणे जिल्ह्यातील शेवटचा इंदापूर तालुक्यातील सराटी येथे निरा नदीच्या घाटामध्ये हरिनामाचा जयघोष करीत ज्ञानोबा... माऊली... तुकाराम... व टाळ मृदंगाच्या निनादात महाराजांच्या पादुकांना चंदन अत्तरचा लेप देत विश्वस्तांच्या उपस्थितीत स्नान घातले.

हा नयनरम्य सोहळा पूलाच्या दोन्ही बाजूने उभा राहून हजारो भाविक



निरास्नानाचा दैदीप्यमान सोहळा पार पडत असताना पहात असल्याचे निदर्शनास आले. यावर्षी पावसाने हजेरी न लावल्यामुळे निरा नदीला पाणी येऊ शकले नाही म्हणून प्रशासनाच्या वतीने टँकरद्वारे पाणी निरा नदीच्या पात्रात सोडून संत तुकाराम महाराजांच्या पादुकांना निरास्नान घालण्यात आले.त्यानंतर पादुका पालखी तळावरती आणण्यात आली. यावेळी नागरिकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती.

यावेळी विश्वस्तांच्या वतीने पुणे जिल्हा ग्रामीण पोलीस अधीक्षक अंकित गोयल, बारामती उपविभागीय अधिकारी वैभव नावडकर, उप पोलीस अधीक्षक आनंद भोईटे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी मिलिंद टोणपे, विभागीय पोलीस अधिकारी गणेश इंगळे, तहसीलदार श्रीकांत पाटील, गटविकास अधिकारी विजयकुमार परीट पोलीस निरीक्षक दिलीप पवार, गटशिक्षणाधिकारी खरात, उप पोलीस निरीक्षक नागेश पाटील, उप पोलीस निरीक्षक प्रकाश पवार, आधी अधिकाऱ्यांचा सन्मान करण्यात आला. त्यानंतर पालखीने नीरा नदी ओलांडून सोलापूर जिल्ह्यात प्रवेश केला.

या पालखी बरोबर पुणे जिल्ह्यातील प्रशासकीय अधिकारी यांनी पालखी सोलापूर जिल्ह्यात पोच केली. तेथे सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी व इतर मान्यवरांनी पालखीचे स्वागत केले.